❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २६२ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये
www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्यूब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# जरांगेंची भाषा अयोग्यच

## कॅबिनेट बैठकीत सर्वच मंत्र्यांचा मुख्यमंत्र्यांसमोर नाराजीचा सूर, सूत्रांची माहिती

■ मुंबई (दै. संध्या)

मनोज जरांगे यांच्या भाषेचे पडसाद आजच्या कॅबिनेट बैठकीत उमटल्याची सूत्रांची माहिती आहे. जरांगेंकडून वापरली जाणारी भाषा अयोग्यच आहे, असं म्हणत सर्व मंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. राज्य सरकार मराठा समाजासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत असताना आंदोलनकर्त्यांकडून घेतली जाणारी भूमिका आक्षेपार्ह असल्याची भूमिका बैठकीनंतरच्या चर्चेत मंत्र्यांनी मांडली.

हिंदू उत्सवाच्या काळातच मुंबईत आंदोलन का, असा सवालही मंत्र्यांकडून कॅबिनेट बैठकीत उपस्थित करण्यात आला, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. दरम्यान, मनोज जरांगे हे उपोषणासाठी मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. अंतरवाली सराटी सोडल्यानंतर ते बीडच्या पाटोद्यात पोहोचतील. त्या ठिकाणी जरांगेंच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली आहे. मनोज जरांगेंचा आजचा मुक्काम पाटोद्यात असणार आहे. त्याच अनुषंगाने ही तयारी सुरू आहे. मांजरसुंबा ते पाटोदा दरम्यान 14 तर पाटोदा शहरात



11 मोठे अन्नछत्र उभारण्यात आले आहेत, तसंच 25 ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. जरांगेंच्या सभेसह मुक्कामाच्या ठिकाणी येणाऱ्या मराठा बांधवांची गैरसोय होऊ नये यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मनोज जरांगेंच्या आंदोलनासाठी मराठा समन्वयकांकडून आझाद मैदानाची पाहणी करण्यात आली. एकीकडे मनोज जरांगे मुंबईकडे रवाना झाले आहेत, तर दुसरीकडे मराठा आंदोलकांकडून आझाद मैदानाची पाहणी करण्यात आली. मुंबई पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारली असतानाही मराठा आंदोलकांकडून ही पाहणी करण्यात आली. मराठा समन्वयक प्रशांत सावंतांनी मैदानाची पाहणी केली.

### मनोज जरांगे यांच्या १३ मागण्या

1) निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या 58 लाख कुणबी नोंदी त्या नोंदीची कुणबी प्रमाणपत्र सर्वांच्या सर्व तात्काळ वाटप करावं. 2) हैदराबाद गॅझिटिअरचा फक्त जीआर काढण्यात आलाय. गॅझिटिअरमध्ये असलेल्या संख्येनुसार मराठवाड्यात कुणबी प्रमाणपत्र देण्यातच आले नाहीत. कुणबी नोंदीच्या संख्येनुसार मराठवाड्यातील सगळ्या मराठा समाजाला तात्काळ कुणबी प्रमाणपत्राचे वाटप करावं आणि याची व्हॅलिडिटी कशी देणार हे पण लगेच स्पष्ट करावं. 3) सातारा संस्थान गॅझेटटियर, कोल्हापूर संस्थान गॅझेटटियर, औंध -पुणे -बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेटियर तात्काळ जीआर काढून लगेचच अंमलबजावणी करावी. 4) महाराष्ट्रातील मराठा आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे सरसकट मागे घेण्यात यावेत, अंतरवाली सराटीतील गुन्हे मागे घ्यावे. 5) मराठा आणि कुणबी हे स्वतंत्र मंत्रालय मराठा समाजासाठी लगेच स्थापन करावं. 6) ज्यांनी ज्यांनी कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेत त्यांना तात्काळ कुणबी प्रमाणपत्र द्यावं, ज्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळालेत त्यांना लगेचच व्हॅलिडिटी द्यावी. 7) मराठा समाजालाही ओबीसींच्या सर्व सवलती सोयी सुविधा देण्याचा जो जीआर काढण्यात आला त्या जीआरची अंमलबजावणी करावी. 8) सारथीच्या सर्व योजना सुरू करण्यात याव्यात. पंजाबराव देशमुख शिष्यवृत्तीचे पैसे तात्काळ द्यावे, होस्टेलच्या सुविधा पण द्याव्यात. 9) मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या बांधवांच्या कुटुंबीयांना तात्काळ नोकरी द्यावी आर्थिक निधी द्यावा. 10) शिंदे समितीला पुन्हा कुणबी नोंदणी शोधण्यासाठी आजपासूनच रेकॉर्ड तपासण्याचे सांगावे. 11) EWS/SEBC/ESBC मधून निवड झालेल्या मराठा विद्यार्थ्यांना आजच नियुक्त द्याव्यात. 12) मराठा तरुणांना अण्णासाहेब पाटील महामंडळामार्फत वाहने दिली ,त्यातूनच व्याज परतावा सरकारने दिले नाहीत. त्या व्याज परताव्याची संपूर्ण रक्कम आजच्या आज द्यावी. 13) सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

# मनोज जरांगे पाटील उपोषण नेमकं कोणासाठी करतायेत?

■ मुंबई (दै. संध्या)

### अजय बारस्करांचा सवाल

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राजकीय वातावरण चांगलच तापलं आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे गेल्या 18 दिवसापासून उपोषण करत आहेत. आज ते मुंबईच्या दिशेनं रवाना झाले आहेत. 19 सप्टेंबरपासून ते मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण करणार आहे. त्यांना मुंबई पोलिसांनी आझाद मैदानावर आंदोलन करण्याची परवानगी नाकारली आहे, तरी देखील ते मुंबईसाठी रवाना झाले आहेत. दरम्यान, या सर्व घटनांवर अजय महाराज बारस्कर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगेचे उपोषण मराठा आरक्षणासाठी की केवळ चौघांचे दाखले मिळवून देण्यासाठी आणि चौकशा थांबवण्यासाठी? असा सवाल बारस्करांनी केलाय. मनोज जरांगे पाटील नेमकं उपोषण कोणासाठी करतायेत? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रातील मराठा समाजाने उपोषण करायला लावले नाही. त्यांच्या जीवाला काही धोका झाला तर कोण जबाबदार आहे. दहीहंडे, पारवे, पांडुरंग तारक, गंगाधर काळकुटे हे लोक जबाबदार असल्याचे बारस्कर म्हणाले. त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे असे बारस्कर म्हणाले. मनोज जरांगे यांचे उपोषण खरोखरच मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी असेल, तर त्यांच्या स्वतःच्या सहीचे मागण्यांचे सविस्तर निवेदन कुठे आहे? त्या निवेदनात नेमक्या कोणत्या मागण्या आहेत आणि



■ आरक्षणाच्या नावावर जरांगेंच्या टोळीनं मोठा पैसा कमावल्याचा आरोप

त्या सरकारकडे अधिकृतपणे कधी सादर करण्यात आल्या, हे समाजासमोर जाहीर करावे, अशी मागणी मराठा आरक्षणाचे अभ्यासक अजय महाराज बारस्कर यांनी केली आहे. सरकारने आतापर्यंत कोणत्या मागण्या मान्य केल्या, कोणते निर्णय घेतले आणि कोणती कार्यवाही प्रलंबित आहे, याची कागदोपत्री माहिती जरांगे समाजासमोर का मांडत नाहीत? आंदोलन केवळ चार व्यक्तींना प्रमाणपत्रे मिळवून देण्यासाठी तसेच ईडी व इतर यंत्रणांकडून सुरू असलेल्या कथित चौकशा थांबवण्यासाठी दबावतंत्र म्हणून केले जात आहे का? याचे स्पष्ट उत्तर त्यांनी द्यावे, असेही बारस्कर यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात...

### धनंजय मुंडे यांची प्रकृती अचानक बिघडली

परळी (दै. संध्या)

माजी मंत्री व राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे आमदार धनंजय मुंडे यांची मंगळवारी अचानक प्रकृती बिघडल्याचे समोर आले आहे. परळीत जनता दरबार सुरू असतानाच मुंडे यांची अचानक तब्येत बिघडली व त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून डॉक्टरांच्या देखरेखीत त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. परळी येथील शासकीय विशेष अतिथीगृहात मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे आमदार धनंजय मुंडे यांचा 'जनता दरबार' आयोजित करण्यात आला होता. मात्र, हा दरबार सुरू असतानाच त्यांना अचानक त्रास होऊ लागला. त्यामुळे त्यांना तातडीने अतिथीगृहाशेजारी असलेल्या एका रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले. सध्या डॉक्टरांनी त्यांची आवश्यक वैद्यकीय तपासणी केली असून पुढील उपचार सुरू केले आहेत, तसेच डॉक्टर त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून आहेत. यापूर्वी फेब्रुवारी 2025 मध्ये धनंजय मुंडे यांना चेहऱ्याच्या स्नायूंशी संबंधित असलेल्या 'बेल पाल्सी' नावाच्या आजाराला सामोरे जावे लागले होते. या आजारामुळे त्यांच्या बोलण्यावरही परिणाम झाला होता. त्यातून सावरल्यानंतर काही दिवसांपूर्वीच त्यांनी स्वतःच्या शारीरिक तंदुरुस्ती आणि वजन कमी करण्याबाबत मिश्किल टिप्पणी केली होती, ज्याची मोठी चर्चा झाली होती.

### लोक न्यायालयात २८३ प्रकरणे निकाली

पाटोदा (दै. संध्या)

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुराणा आणि सचिव डॉ. वहाब साहेब, बीड यांच्या आदेशानुसार पाटोदा येथील तालुका विधी सेवा समितीच्या वतीने शनिवार, १२ सप्टेंबर रोजी लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले. लोकन्यायालयात एकूण २ हजार २५९ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी २८३ प्रकरणे निकाली काढण्यात आली. १८ लाख ५८ हजार ८७७ रुपयांच्या रकमेवर तडजोड झाली. लोकन्यायालयासाठी दोन पॅनलची व्यवस्था करण्यात आली होती. पॅनल क्रमांक एकचे पॅनल प्रमुख माननीय न्यायाधीश एम.ए. शिंदे होते. पॅनल सदस्य म्हणून पाटोदा वकील संघाचे सदस्य के. एस. चौरे यांनी काम पाहिले. पॅनल क्रमांक दोनचे पॅनल प्रमुख माननीय सहदिवाणी न्यायाधीश श्रीमती एस. आर. पाटील होत्या. पॅनल सदस्य म्हणून बी. आर. लऊळ यांनी जबाबदारी सांभाळली. लोकन्यायालयात प्रलंबित असलेल्या १ हजार १०० प्रकरणांपैकी ५९ प्रकरणांचा तडजोडीने निपटारा झाला. कौटुंबिक वादामुळे दुरावलेल्या एका वैवाहिक जोडप्यात समेट घडवून आणण्यात यश आले. दोन्ही बाजूंचे म्हणणे समजून घेण्यात आले. न्यायालयीन प्रक्रियेतून वादाला पूर्णविराम मिळाला. संबंधित दाम्पत्याने पुन्हा एकत्र येण्याचा मार्ग स्वीकारला.

## ६ वर्षे वाट पाहिली, देवाने न्याय दिला!

# दिशाच्या वडिलांचा खळबळजनक खुलासा

■ मुंबई (दै. संध्या)

दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियान हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाला आता अत्यंत गंभीर आणि नाट्यमय वळण लागले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर केंद्रीय अन्वेषण विभागाने अखेर या प्रकरणात गुन्हा दाखल करून सखोल तपासाला सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर दिशाचे वडील सतीश सालियान यांनी वृत्तसंस्था एएनआयशी बोलताना अत्यंत खळबळजनक दावे केले आहेत. "आम्ही 6 वर्षे न्यायासाठी वाट पाहिली, अखेर देवाने आम्हाला हा दिवस दाखवला," अशी भावनिक प्रतिक्रिया देत त्यांनी सीबीआयकडे नोंदवलेल्या जबाबात शिवसेना नेते आदित्य ठाकरे, अभिनेते डिनो मोरिया, सूरज पांचोली यांच्यासह अनेक बड्या व्यक्तींची नावे थेट दिल्याचे उघड केले आहे. सतीश सालियान यांनी गेल्या काही वर्षांत न्यायासाठी केलेल्या संघर्षाचा पाढा वाचताना सांगितले. "सुरुवातीला या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथक (SIT) गठीत करण्यात आले होते, मात्र त्या एसआयटीने काहीही केले नाही. मी तब्बल दोन वर्षे वाट पाहिली. त्यानंतर आशुतोष सरांच्या मध्यस्थीने मी ॲडव्होकेट नीलेश ओझा यांना भेटलो. आम्ही पहिल्यांदा एफआयआर



दाखल करण्यासाठी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयात गेलो, परंतु तेथून आम्हाला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही." "त्यानंतर वकिलांच्या सल्ल्यानुसार आम्ही न्यायालयात दाद मागितली. तिथेही तारखांवर तारखा पडत होत्या आणि वेळ निघून जात होता. सुमारे दीड वर्ष असेच गेले. अखेर अडीच दिवस चाललेल्या प्रदीर्घ सुनावणीनंतर न्यायालयाने हे प्रकरण सीबीआयकडे सोपवण्याचे आदेश दिले." दिशा सालियानवर झालेल्या अन्यायाबाबत बोलताना सतीश सालियान यांनी अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. सतीश सालियान म्हणाले, "माझ्या मुलीवर ज्यांनी अत्याचार केला, त्या सर्वांची नावे मी तपास अधिकाऱ्यांना दिली आहेत. घटनेचा संपूर्ण तपशील आणि माहिती मी माझ्या जबाबात सीबीआयला दिली आहे."


# पीडित कुटुंबीयांसाठी ६ दिवसांपासून खासदाराचे उपोषण

■ वर्धा (दै. संध्या)

### रोहित पवार भेटीला; मृतदेहावर अद्यापही अंत्यसंस्कार नाहीत

जिल्ह्यातील रायपूर इथं वाघाच्या हल्ल्यात शेतकरी भगवान धुर्वे यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेनंतर धुर्वे यांच्या कुटुंबीयांना प्रशासनाविरुद्ध आंदोलनाचा पवित्रा घेतला असून स्वत: खासदार कल्याण काळे हेही गेल्या 6 दिवसांपासून आंदोलनात सहभागी झाले आहेत. भगवान धुर्वे यांच्या मृत्यूनंतर सुरू झालेलं ठिय्या आंदोलन आता अधिकच आक्रमक झालं. विशेष म्हणजे, गेल्या सहा दिवसांपासून भगवान धुर्वे यांच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले नाहीत. कुटुंबीयांना मदत आणि इतर मागण्यांसाठी खासदार अमर काळे कुटुंबीयांसह सहा दिवसांपासून आंदोलनाला बसले आहेत. त्यामुळे, आज आमदार रोहित पवार यांनी आंदोलनस्थळी भेट दिली.

वर्ध्यातील पीडित कुटुंबीयांच्या या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आमदार रोहित पवार वर्ध्यामध्ये दाखल झाले. त्यांच्या उपस्थितीमुळे आंदोलनाला आणखी बळ मिळालं आहे. रोहित पवार यांच्यासह खासदार अमर काळे, जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले, काँग्रेसचे उदय मेघे आणि ग्रामस्थ देखील मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले आहेत. गेल्या सहा दिवसांपासून जिल्हा प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमध्ये मागण्यांवरून चर्चा आणि वाटाघाटी सुरू होत्या. मात्र, या वाटाघाटींना अपेक्षित तोडगा न निघाल्यानं आंदोलन आता



आक्रमक झालंय. वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या पीडित कुटुंबाला नियमानुसार मदत तसेच गाव स्तरावर सुधारणा करण्यासाठी प्रशासनाकडून पावले उचलली असल्याची माहिती जिल्हाधिकारी वान्मती. सी. यांनी आज पत्रकार परिषदेत दिली होती. ग्रामस्तरावर असलेली समिती, स्थानिक नागरिक, आणि नातेवाईक तसेच सामाजिक संघटना यांच्याशी संवाद साधून गावकऱ्यांच्या मागण्या शासनापर्यंत पोहचविल्या आहेत. वन विभागाकडून कुटुंबातील एकाला कंत्राटी वाहनचालक अथवा वनमजूर म्हणून घेण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. सर्व गावकरी आणि नातेवाईक यांच्याशी सतत पाठपुरावा करत संवाद सुरु आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार पुढील योग्य ती कारवाई करण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी वान्मती सी यांनी म्हटले होते. मात्र, अद्यापही आंदोलनावर तोडगा निघाला नाही.

# आमदारांनी वेगळी भूमिका घेतली तीच राजकीय फूट समजावी

## *एकनाथ शिंदेंच्या वकिलांचा जोरदार युक्तिवाद, ठाकरेंचे मुद्दे खोडून काढले*

■ मुंबई (दै. संध्या)

शिवसेनेच्या बाबतीत विधानसभा अध्यक्ष आणि निवडणूक आयोगाने जो निकाल दिला तो योग्यच असून घटनेचं कोणतंही उल्लंघन झालं नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाने शिवसेना ही एकनाथ शिंदे यांच्याकडेच ठेवण्याचा निर्णय घेतला, असा युक्तिवाद जेष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी केला. पक्ष आणि चिन्ह कुणाचं हे आमदार आणि खासदारांच्या संख्येवर ठरवण्यात आलं आणि निवडणूक आयोगाला तसा निर्णय घेण्याचा अधिकार आहे, अशा दावाही नीरज किशन कौल यांनी केला.

विधिमंडळातील फूट म्हणजे राजकीय फूट नव्हती, निवडणूक आयोगाने विधिमंडळातील फूट म्हणजे राजकीय फूट समजून शिवसेना शिंदेंना दिल्याचा दावा ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला होता. सिब्बलांचा हा मुद्दा खोडून काढताना नीरज किशन कौल यांनी युक्तिवाद केला. उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या विचारधारेच्या विरोधात भूमिका घेत काँग्रेससोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्याचवेळी आमदार आणि खासदारांनी वेगळी भूमिका घेतली. आमदार आणि खासदारांनी वेगळी भूमिका घेणं म्हणजेच पक्षातील राजकीय फूट होती, असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला.

सर्वोच्च न्यायालयात शिवसेना ठाकरे गटाने 2024 मध्ये दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी



सुरू आहे. या याचिकेत महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांनी संविधानाच्या 10व्या अनुसूचीअंतर्गत शिंदेंच्या शिवसेना आमदारांना अपात्र ठरवण्यास नकार दिला होता. अध्यक्षांच्या या निर्णयाला आव्हान देण्यात आलं आहे. तसंच, शिवसेनेचा अधिकृत पक्ष म्हणून एकनाथ शिंदे यांच्या गटाला मान्यता देण्याच्या निवडणूक आयोगाच्या (ECI) निर्णयाला आव्हान देणारी याचिकाही सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी सूचीबद्ध आहे. राजकीय पक्षामधील वाद म्हणजे त्या पक्षात दोन गट पडले पाहिजेत असं नाही. ते वाद हे वेगवेगळ्या स्वरुपात असू शकतात. जर आमदार आणि खासदारांनी वेगळी भूमिका घेतली तर तो देखील राजकीय वाद असतो. त्या आधारे निवडणूक आयोगाला निर्णय घेण्याचा अधिकार असल्याचा दावा नीरज किशन कौल यांनी केला. या आधी ठाकरे गटाच्या बाजूने युक्तिवाद करताना ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी विधानसभा अध्यक्ष

एकनाथ शिंदे यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ नीरज किशन कौल यांनी पक्षाची 1999 सालची राज्यघटना कशी अस्तित्वात आली, याबाबत न्यायालयाला माहिती दिली. कौल: पक्षातील 'पक्षप्रमुख' हे पद 2018 मध्ये निर्माण झालं, हा त्यांचा युक्तिवाद चुकीचा आहे. हे पद 2013 मध्येच अस्तित्वात आलं होतं. पक्षाचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या सन्मानार्थ 'प्रमुख' हे पद गोठवण्यात आलं आणि त्यानंतर 'पक्षप्रमुख' हे पद आलं.

आणि निवडणूक आयोगाचा निर्णय कसा चुकीचा होता हे कोर्टाला सांगितलं. शिवसेना फुटीमध्ये 10 व्या अनुसूचीचे उल्लंघन करण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. आता त्यावर शिंदेंच्या वतीने ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी प्रतिवाद सुरू केला आहे. त्यांचा प्रयत्न असा आहे की, निवडणूक आयोगाने यापूर्वी कधीही न झालेली किंवा ऐकिवात नसलेली कृती केली, असा आभास निर्माण केला जात आहे. मात्र, संविधानाच्या कलम 324 अंतर्गत निवडणूक आयोगाला व्यापक आणि पूर्ण अधिकार आहेत. निवडणूक आयोगाला पक्षाच्या घटनेत मूलतः लोकशाही व्यवस्था असली पाहिजे, म्हणजेच पदांवर व्यक्तींची निवड झाली पाहिजे आणि तात्पुरत्या किंवा तदर्थ नियुक्त्यांना प्रोत्साहन देता कामा नये, असं सांगण्याचा अधिकार नाही, असं म्हणता येणार नाही.

# इम्रान खानला वाचवण्यासाठी क्रिकेटविश्व एकवटलं

■ मुंबई (दै. संध्या)

पाकिस्तान क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि देशाला पहिला वनडे वर्ल्ड कप जिंकून देणारे इम्रान खान सध्या तुरुंगात आहेत. तुरुंगातील त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याच्या बातम्या समोर आल्यानंतर क्रिकेट विश्वातून त्यांच्या समर्थनार्थ आवाज उठू लागला आहे. आता ऑस्ट्रेलियाच्या तब्बल सात माजी कर्णधारांनी इम्रान खान यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. ऑस्ट्रेलियाच्या सात माजी कर्णधारांनी आपल्या देशाच्या परराष्ट्रमंत्री पेनी वोंग यांना पत्र लिहून इम्रान खान यांच्या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. तुरुंगातील त्यांच्या कथित खराब प्रकृतीबाबत या माजी कर्णधारांनी चिंता व्यक्त केली आहे. या पत्रावर ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार आणि भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक ग्रेग चॅपेल यांच्यासह ॲलन बॉर्डर, इयान चॅपेल, किम ह्यूज, मार्क टेलर, स्टीव्ह वॉ आणि ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाची माजी कर्णधार बेलिंडा क्लार्क यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. ग्रेग चॅपेल यांनी परराष्ट्रमंत्री पेनी वोंग यांची भेट घेण्याची इच्छाही व्यक्त केली आहे. त्यांनी इम्रान खान यांना अखेरचे 2022 मध्ये इस्लामाबादमध्ये भेटले होते. त्यावेळी इम्रान खान पाकिस्तानचे पंतप्रधान होते. या पत्रात माजी कर्णधारांनी म्हटले आहे की, इम्रान खान यांच्या सध्याच्या प्रकृतीबाबत समोर येणाऱ्या बातम्यांवर विश्वास ठेवणे कठीण आहे. राजकीय व्यक्ती किंवा राजनैतिक प्रतिनिधी म्हणून नव्हे, तर ऑस्ट्रेलियाचे माजी क्रिकेट कर्णधार म्हणून या प्रकरणात आवाज उठवणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# संपादकीय

## श्री गणेशाला साकडे

श्री गणेशाच्या मंगल आगमनाने तमाम भाविकांमध्ये चैतन्याचे वातावरण पसरलेले आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सवच नाही तर महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सास्कृतीक जीवनाचा अविभाज्य भाग आहे बुद्धी. विवेक. ज्ञान. समृद्धी आणि शुभारंभाचे प्रतिक असलेल्या गणरायाचे आगमन म्हणजे नव्या आशा आकाक्षाचे आगमन समजले जाते. विघ्नहर्ता म्हणून गणेशाची पूजा केली जाते. कोणतेही शुभकाम सुरु करण्यासाठी गणेशाचे स्मरण करण्याची परंपरा याच श्रध्देतून निर्माण झालेली आहे. कारण गणेश म्हणजे अडथळे दूर करणारी शक्ती आणि योग्य दिशा दाखवणारी बुध्दी. गणेशाला विघ्नहर्ता का म्हटले जाते यामागे केवळ धार्मिक भावना नाहीतर संपूर्ण जीवनाचे मोठे तत्वज्ञान दडलेले आहे. मनुष्याच्या अनंत अडचणी बाह्य परिस्थितीमुळे निर्माण होतात. परंतु काही अडचणी चुकीचे निर्णय. अहंकार. अविचार. लोभ.आणि संयमाच्या अभावामुळे निर्माण होतात. गणेशाची उपासना म्हणजे दोन्ही प्रकारच्या अडथळ्यावर मात करण्यासाठी शक्ती आणि विवेकाची प्रार्थना.व गणेशपूजा ही सुबुध्दीची मानसपूजा आहे. असे समजले जाते. गणेश हा केवळ एका व्यक्तीचा किंवा समाजाचा देव नाही. महाराष्ट्रातील सार्वजनिक जीवनात गणेशोत्सवाने सामाजिक एकात्मकतेची मोठी भूमिका बजावलेली आहे व आजही बजावत आहे. जात. धर्म. भाषा. आर्थिक परिस्थीती याचे सारासार भेद बाजूला ठेवून भाविक गणरायाचे चरणी एकत्र येतात. म्हणूनच आजच्या काळात गणेशोत्सवाचा संदेश अधिक व्यापक करण्याची नितांत आवश्यकता आहे. आजच्या घटकेला महाराष्ट्र राज्यासमोर अनेक खडतर आव्हाने उभी आहेत. शेतीसमोरील संकट. शेतकऱ्यांचे प्रश्न. बेरोजगारी. महागाई. शहरातील वाहतूक समस्या. प्रदुषण. पाणीप्रश्न. वाढत असलेली व्यसनाधिनता. सायबर गुन्हेगारी. महिलाच्या सुरक्षेचे गंभीर प्रश्न. भ्रष्टाचार आणि सामाजिक तणाव ही मोठी आव्हाने दिवसेदिवस वाढतच आहेत. हे निश्चितच चिताजनक आहे. जनतेच्या हितासाठी राज्यात सकारात्मक समाजकारण व राजकारण होणे अपेक्षित असताना दिवसेदिवस राजकारणाची पातळी खालावत चाललेली आहे या वातावरणामुळे गणेशाचे भाविक हवालदिल झालेले दिसत आहे. या सगळ्यां संकटाचे निवारण देवाकडे प्रार्थना करून होणार नाही. महाराष्ट्रातील प्रत्येक घरात सुख. शांती. आरोग्य आणि समृद्धी नांदो. शेतकरी. कामगार. विद्यार्थी. महिला. उद्योजक आणि सर्वसामान्य नागरीकाचे प्रश्न दूर होवोत. महाराष्ट्रात विकासाबरोबर सामाजिक धार्मिक सलोखा आणि पर्यावरणीय संतुलन टिकून राहावो ही विघ्नहर्ता गणरायाचे चरणी प्रार्थना गणरायाने विघ्ने दूर करावीतक अशी अपेक्षा करत असताना आपणही आपल्या वाट्याला येणारे प्रयत्न प्रामाणिकपणे करणे आवश्यक आहे. प्रत्येकाला जीवनात सुबुध्दी. सुख. शांती. समृद्धी लाभो हीच गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रार्थना.

## थोडक्यात पण महत्वाचे



### गिटस् कंपनीमधील तांब्याची केबल चोरी करणारा आरोपी यवत पोलीसांकडुन जेरबंद

**यवत : दैनिक संध्या**

यवत पोलीस स्टेशन च्या हद्दीतील नांदुर ता. दौंड जि.पुणे गावचे हद्दीत गिट्स कंपनीमधील एकुण ९४,०००/-रूपये किंमतीच्या वेगवेगळ्या आकाराच्या तांब्याचे केवल चोरी गेल्याने यवत पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याच्या तपासकरीता तात्काळ तपास पथक तयार करून अज्ञात आरोपीचा सी.सी. टी.व्ही. फुटेज आधारे शोध घेतला असता सदर केबल चोरी ही सागर विभिषण जाधव,( वय २५ वर्षे, व्यवसाय मजुरी, सध्या रा. तुपेवस्ती, ता. हवेली जि.पुणे, मुळ रा.सहजपुर ता. दौंड) जि.पुणे याने केल्या असल्याची खात्रीशिर माहिती प्राप्त झाल्याने यास ताब्यात घेवुन गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने गुन्हा केला असल्याची कबुली दिली. त्यानंतर त्यास अटक करून गुन्ह्याचे तपासादरम्यान एकुण ६०,०००/- रू. किंमतीच्या तांब्याच्या केवल व गुन्हा करतेवेळी वापरलेली मोटारसायकलसह असा एकुण १,००,०००/- रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दाखल गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक श्री. संतोष तासगावकर यांचे मार्गदर्शनाखाली पो. हवा. रविंद्र मोहिते करीत आहेत. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. संदिपसिंह गिल्ल सौो., मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. गणेश विरान्दार सौो, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. बापुराव दडस सौो. यांचे मार्गदर्शनाखाली यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. संतोष तासगावकर, तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक मारोती मेतलवाड, पो. हवा. संदिप देवकर, पा.हवा. रॉकी देवकाते, पो. कॉ धिरज जाधव, पो. कॉ. प्रतिक जगताप, पो. कॉ. अमोल भुजबळ, पो.कॉ. सचिन गुंड, पो. कॉ. दिनेश लोणकर, व पो.कॉ. विनित कुन्हाडे यांनी केलेली आहे.

### किशोर रोहम यांचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा

**मुंबई : दैनिक संध्या**

विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाचे आजीव सभासद व डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार महाराष्ट्र शासन प्राप्त किशोर रोहम यांचा सहस्त्र चंद्रदर्शन वाढदिवस सोहळा गुरुवारी उत्साहात प्रभात कट्ट्यावर साजरा झाला.मंडळाचे सचिव ज्येष्ठ पत्रकार समाजभूषण नासिकेत कृष्णकांत पानसरे, उपाध्यक्ष निवृत्ती मस्के,मंडळाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक कृष्णा काजरोळकर, सल्लागार वासुदेव कदम, सी. के.सर्वगोड,दिपक देशनेहरे, विलास देशनेहरे, चंद्रकांत सोनवणे आदींची गौरवपूर्ण भाषणे झाली.प्रारंभी प्रभात समयी गायकांनी गाणी गाऊन वातावरण प्रफुल्लित केले होते.



# प्रणती नायक आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार

■ **भुवनेश्वर (दै. संध्या)**

भुवनेश्वर येथील ओडिशा एएम/एनएस इंडिया जिम्नॅस्टिक्स हाय परफॉर्मन्स सेंटर (ओडिशा एएम/एनएस जीएचपीसी) मध्ये सराव करणारी ऑलिम्पिअन प्रणती नायक हिची जपानमधील आयची-नागोया येथे 19 सप्टेंबर ते 4 ऑक्टोबर दरम्यान आयोजित होणाऱ्या 20 व्या आशियाई क्रीडा स्पर्धा 2026 मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे. प्रणती ही आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेली एकमेव भारतीय जिम्नॅस्ट असून ती आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्समधील महिलांच्या व्हॉल्ट आणि महिलांच्या ऑल-अराउंड प्रकारांत भाग घेणार आहे. तिची ही निवड तिच्या सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरीनंतर झाली आहे, ज्यामध्ये ताश्कंद, उझबेकिस्तान येथे पार पडलेल्या एफआयजी वर्ल्ड चॅलेंज कप 2026 मध्ये महिलांच्या व्हॉल्ट प्रकारात जिंकलेल्या रौप्यपदकाचाही समावेश आहे.

एएम/एनएस इंडियाचे संचालक आणि उपाध्यक्ष – एचआर व प्रशासन, आशुतोष तेलंग म्हणाले, "आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारताची एकमेव जिम्नॅस्ट म्हणून प्रणतीची झालेली निवड ही एक अत्यंत महत्त्वाची उपलब्धी आहे आणि हे तिचे सातत्य, शिस्त व दृढनिश्चय दर्शवते. ओडिशा एएम/एनएस इंडिया जिम्नॅस्टिक्स हाय परफॉर्मन्स सेंटरमध्ये खेळाडूंना सर्वोच्च स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण आणि साहाय्य उपलब्ध करून देण्यावर



आमचा भर असतो. आयची-नागोया येथे भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आम्ही प्रणतीला खूप खूप शुभेच्छा देतो."प्रणतीने टोकियो 2020 ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले होते आणि तिने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सातत्याने चमकदार कामगिरी नोंदवली आहे. 2026 मध्ये तिने ताश्कंद येथील एफआयजी वर्ल्ड चॅलेंज कपमध्ये रौप्य आणि 54 व्या ऑल इंडिया रेल्वे जिम्नॅस्टिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक पटकावले, याशिवाय तिने ग्लासगो येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतही भारताचे प्रतिनिधित्व केले.2025 मध्ये तिने एशियन आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स चॅम्पियनशिप आणि एफआयजी ॲपॅरेटस वर्ल्ड कपमध्ये कांस्यपदक जिंकले होते, तसेच 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत एक सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्यपदक पटकावले होते. गेल्या काही वर्षांत तिने अनेक राष्ट्रीय स्पर्धा आणि आंतरराष्ट्रीय एफआयजी स्पर्धांमध्ये पदके जिंकली आहेत.

# जगभरातील लाखो भारतीयांसाठी सर्वसमावेशक कार्डलेस पेमेंट सुविधा!

■ **पुणे (दै. संध्या)**

फोनपे आणि व्हिसा यांनी आज संयुक्तपणे तीन नवीन पेमेंट सोल्यूशन्स लाँच करण्याची घोषणा केली आहे: 'टॅप टू पे', 'क्रॉस बॉर्डर स्कॅन टू पे' आणि 'स्मार्ट एक्सेप्ट'. ग्लोबल फिनटेक फेस्ट 2026 मध्ये मंचावर दोन्ही संस्थांच्या नेतृत्वाकडून अनावरण करण्यात आलेल्या या भागीदारीमुळे, आंतरराष्ट्रीय व्यवहारांसाठी 'क्रॉस बॉर्डर स्कॅन टू पे' सादर करणारे फोनपे हे भारतातील पहिले ॲप बनले आहे.

याशिवाय, ग्राहकांसाठी व्हिसाच्या तीन मुख्य क्षमतांचा संपूर्ण संच सक्षम करणारे फोनपे हे पहिलेच ॲप ठरले आहे: 'ऑनलाइन डिव्हाइस टोकनायझेशन', 'टॅप टू पे', आणि 'क्रॉस बॉर्डर स्कॅन टू पे'. यासोबतच, हे प्लॅटफॉर्म 'स्मार्ट एक्सेप्ट' द्वारे कार्डद्वारे पेमेंट स्वीकारण्यासाठी छोट्या-व्यापाऱ्यांना सक्षम करत आहे.

फेब्रुवारी 2025 मध्ये प्लॅटफॉर्मवर लाँच करण्यात आलेल्या व्हिसा डिव्हाइस टोकनायझेशनवर आधारित, हा पुढाकार एक विनाअडथळा आणि कार्डलेस पेमेंट इकोसिस्टम प्रस्थापित करतो. एकदा युझर्सनी त्यांचे व्हिसा कार्ड फोनपेवर सेव्ह केले की, ते दुकानांमध्ये पेमेंट करण्यासाठी फक्त त्यांचा फोन टॅप करू शकतात, त्यांच्या आवडत्या ई-कॉमर्स मर्चंट्सवर ऑनलाइन चेकआउट करू शकतात, किंवा परदेशात प्रवास करताना क्यूआर कोड स्कॅन करू शकतात; यामुळे सोबत फिजिकल कार्ड बाळगण्याची गरज पूर्णपणे संपते.

या पेमेंट सोल्यूशन्सच्या मुख्य वैशिष्ट्यांमध्ये खालील घटकांचा समावेश आहे: टॅप टू पे: अँड्रॉइड युझर्स कमी नेटवर्क कनेक्टिव्हिटी असलेल्या ठिकाणीही पॉइंट-ऑफ-सेल मशीन्सवर कॉन्टॅक्टलेस पेमेंट्स करण्यासाठी त्यांचे व्हिसा कार्ड टोकनाइज करू शकतात. टॅप टू पे ची सेवा 9 सप्टेंबर 2026 पासून टप्प्याटप्प्याने उपलब्ध केली जाईल. क्रॉस बॉर्डर स्कॅन टू पे: या लाँच सोहळ्यात अनावरण करण्यात आलेले हे वैशिष्ट्य युझर्सना सिंगापूर, मलेशिया, थायलंड, व्हिएतनाम, इंडोनेशिया, श्रीलंका, जपान, चीन आणि दक्षिण कोरिया यासह 14 प्रमुख आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये व्हिसा-सपोर्टेड क्यूआर कोड स्कॅन करण्याची परवानगी देते. यामुळे परदेशात प्रवास करणाऱ्या भारतीय पर्यटकांसाठी चलनाचे एक्सचेंज करण्याचा त्रास दूर होतो. हे वैशिष्ट्य लवकरच युझर्ससाठी उपलब्ध केले जाईल. युनिफाइड ऑनलाइन टोकनायझेशन: प्लॅटफॉर्ममध्ये समाविष्ट केलेल्या या सुविधेमुळे युझर्स सर्व सहभागी ई-कॉमर्स मर्चंट्सवर 'एकदा सेव्ह करा, कुठेही वापरा' या सुरक्षित चेकआउट अनुभवाचा आनंद घेऊ शकतात. लाखो ग्राहक आधीपासूनच फोनपे प्लॅटफॉर्मवर या वैशिष्ट्याचा अनुभव घेत आहेत.

### सुलभ, सहज आणि सुरक्षित

या लाँचप्रसंगी बोलताना फोनपेचे संस्थापक आणि सीपीटीओ राहुल चारी म्हणाले, "फोनपे मधील आमचा दृष्टीकोन नेहमीच असे तंत्रज्ञान बनवण्याचा राहिला आहे जे पेमेंट्स सार्वत्रिकपणे सुलभ, सहज आणि सुरक्षित करते. व्हिसासोबतची ही भागीदारी जागतिक स्तरावर तो दृष्टीकोन वाढवण्यातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. व्यापाऱ्यांसाठी 'स्मार्ट एक्सेप्ट' सोबत ऑनलाइन टोकनायझेशन, टॅप टू पे आणि क्रॉस-बॉर्डर क्यूआर पेमेंट्स एकत्रित करून, आम्ही संपूर्ण पेमेंट व्हॅल्यू चेन मधील सर्व अडचणी दूर करत आहोत. या भागीदारीद्वारे, आम्ही फक्त कार्ड्सचे डिजिटायझेशन करत नाही आहोत, तर भारतीय ग्राहक आणि सूक्ष्म-व्यापाऱ्यांसाठी सीमाहीन आणि कार्डलेस व्यापाराचा एक नवीन मानक प्रस्थापित करत आहोत." व्हिसाचे भारत आणि दक्षिण आशियाचे ग्रुप कंट्री मॅनेजर सुरेश सेठी म्हणाले, "भारत हा जागतिक डिजिटल पेमेंट क्रांतीमध्ये अग्रेसर आहे आणि व्हिसाला या बदलामध्ये उत्प्रेरक असल्याचा अभिमान आहे. फोनपे सोबतची आमची भागीदारी या दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल आहे आणि एक सामायिक दृष्टीकोन दर्शवते - तो म्हणजे सीमा ओलांडून प्रत्येक भारतीयासाठी विश्वासार्ह, सुरक्षित आणि विनाअडथळा व्यापार सुलभ करणे. आमचे जागतिक नेटवर्क, टोकनायझेशन क्षमता आणि फोनपेची अतुलनीय पोहोच यांना एका विनाअडथळा अनुभवामध्ये एकत्र आणून, आम्ही केवळ पेमेंट्स सोपे करत नाही आहोत, तर भारत जागतिक अर्थव्यवस्थेशी कसा जोडला जातो याचा पुनर्विचार करत आहोत. हे सहकार्य जगभरात पेमेंट करण्याचे आणि प्राप्त करण्याचे सर्वोत्तम माध्यम असण्याच्या व्हिसाच्या दृष्टीकोनाला पुनरुच्चारित करते, जे तितकेच सुरक्षित आणि सोपे पेमेंट अनुभव प्रदान करते."

# जुन्नर न्यायालयात लोकअदालतमध्ये ६८२३ प्रकरणांचा निपटारा



■ **नारायणगाव (दै. संध्या)**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या सौजन्याने तसेच तालुका विधी सेवा समिती जुन्नर यांच्या वतीने जिल्हा व अति सत्र न्यायालय जुन्नर येथे शनिवार (दि.१२ रोजी) राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. जुन्नर न्यायालयातील लोकन्यायालयचे उद्‌घाटन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय जुन्नर जिल्हा न्यायाधीश-१ एस.बी.शेलार साहेब यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.

याप्रसंगी न्याय आपल्या दारी या संकल्पनेनुसार विधिसेवा प्राधीकरण आपल्यापर्यंत पोहोचत आहे. पक्षकारांनी लोक न्यायालयाच्या माध्यमातून आपली प्रलंबित प्रकरणे निकाली काढून आयुष्यातील महत्वाचा वेळ आणि पैसा वाचवावा असे आवाहन जिल्हा व अति सत्र न्यायाधीश एस.बी. शेलार साहेब यांनी केले. तसेच या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी लोकन्यायालय पॅनल प्रमुख न्यायाधीश जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय जुन्नर एस.बी. शेलार साहेब, ए.एम.हुसेन दिवाणी वरिष्ठ न्यायाधिश जुन्नर, अनंत एच बाजड २ रे सह दिवाणी व फौजदारी न्यायाधिश जुन्नर, श्रीमती रंजना कुंभार ३ रे दिवाणी न्यायाधीश क स्तर जुन्नर तसेच जुन्नर वकील बार असोसिएशन उपाध्यक्ष ॲड संतोष लोहके, उपाध्यक्ष निलीमा शेरकर, सचिव पुराणिक नलावडे, लोक अदालत पॅनल सदस्य ॲड. वर्षा टिंगरे, ॲड. शिवाजी केदार, ॲड.लता वायाळ, ॲड.कर्मेश गाडेकर, तसेच समर्थ लॉ कॉलेज बेल्हेचे स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.सदर लोक न्यायालयामध्ये वाहनांवरील दंड, दिवाणी दावे फौजदारी दावे, दावा दाखल पूर्व बँकेची वसुली प्रकरणे, ग्रामपंचायत, महावितरण, पतसंस्था, फायनान्सची प्रकरणे तडजोडी करिता ठेवण्यात आली होती दिवसभराच्या कामकाजात लोकन्यायालयाचे चार पॅनल मध्ये दोन्ही बाजूच्या पक्षकारांचे म्हणणे ऐकून व त्यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात येऊन त्याद्वारे एकूण ६८२३ प्रकरणे आपसी समझोता व तडजोड करून निकाली काढण्यात आली तसेच प्रलंबित व दाखलपुर्व प्रकणांतील रक्कम ४ कोटी ३९ लाख २६ हजार २८७ रुपये रक्कमेची वसूली करण्यात आली.

# नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने विशेष पुरस्कार देऊन सन्मान

■ **पुणे (दै. संध्या)**

कोरेगावमुळ,(दै.संध्या): माहिती सेवा समितीच्या माध्यमातून गेल्या १५ वर्षांपासून सामाजिक, पर्यावरणीय आणि जनहिताच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले जात असून, संस्थेचे काम निश्चितच कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार माजी सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य हर्षवर्धन पाटील यांनी काढले. नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते.

माहिती सेवा समितीचे अध्यक्ष चंद्रकांत गोविंद वारघडे पाटील यांना महाराष्ट्र शासनाचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार माजी सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य हर्षवर्धन पाटील, अध्यक्ष – इंडियन फार्मसी कौन्सिल, दिल्ली विजय पाटील, नगरसेवक ऐश्वर्या सुरेंद्र पठारे, अध्यक्ष – नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य सचिन कोतवाल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी असोसिएशनचे विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.



माहिती सेवा समिती गेल्या १५ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. दुष्काळी भागातील जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देणे, माहितीचा अधिकार कायदा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे, नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणे, जनहिताच्या प्रश्नांसाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करणे यासह पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रातही संस्थेने उल्लेखनीय काम केले आहे. संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत १ लाखांपेक्षा अधिक वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे. तसेच हजारो जलशोषक चर खोदून पावसाचे वाहून जाणारे पाणी जमिनीमध्ये मुरवण्याचे काम करण्यात आले आहे.

# एकतेचा संदेश देणारा दहीहंडी उत्सव : प्रा. दुर्गाडे



■ **वाल्हे : (दै. संध्या)**

दहीहंडी हा केवळ एक धार्मिक किंवा सांस्कृतिक सण नसून तो तरुणांना एकत्र आणणारा आणि समाजात सामाजिक एकतेची भावना दृढ करणारा उत्सव आहे, असे प्रतिपादन जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे यांनी केले.

वाल्हे ( ता. पुरंदर ) येथे महाराजा ग्रुप पुरंदरच्या वतीने दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित कार्यक्रमात प्रा. दुर्गाडे हे बोलत होते. ते पुढे म्हणाले श्रीकृष्णाच्या बाललीलांचे स्मरण करून देणारा हा सण शिस्त, जिद्द आणि एकमेकांना साथ देण्याची शिकवण देतो. थरावर थर रचून मानवी मनोरा उभा करताना जशी एकमेकांवर विश्वासाची गरज असते, तशीच समाजाच्या प्रगतीसाठी आणि देशाच्या विकासासाठी नागरिकांमधील आपापसातील एकता आणि बंधुभाव अत्यंत आवश्यक आहे. यावेळी गोविंदा पथकाने शिस्तबद्ध रीतीने आणि उत्साहात मानवी मनोरे रचून उपस्थितांची मने जिंकली. तर दहीहंडी आयोजकांनी देखील सुरक्षेच्या सर्व नियमांचे पालन करत या उत्सवासाठी उत्कृष्ट आयोजन केले होते. या सोहळ्यासाठी जिल्हा परिषदेच्या सदस्या डॉ.प्राजक्ता दुर्गाडे सरपंच अतुल गायकवाड सुकलवाडी चे संदेश पवार उपसरपंच सागर भुजबळ महाराजा ग्रुपचे अतुल महाराज पवार ओंकार दुर्गाडे बंडाशेठ पवार गुरु पवार माथाडी कामगार संघटनेचे नेते निलेश पवार आरपीआयचे शाखाध्यक्ष शैलेंद्र भोसले तंटामुक्ती समितीचे जयवंत भुजबळ सत्यवान सूर्यवंशी तसेच सतीश पवार पाटील गोपीनाथ पवार धनंजय भुजबळ विशाल पवार यांसह परिसरातील नागरिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## सफाई कर्मचारी व सुरक्षारक्षकांच्या हस्ते महापौर निवासातील श्रीगणरायाची आरती

**पुणे : दैनिक संध्या**

गणेशोत्सवाच्या मंगलमय पर्वानिमित्त महापौर निवासातील श्रीगणरायाची आज सकाळची आरती महापौर निवासाची स्वच्छता, देखभाल आणि सुरक्षा व्यवस्था सांभाळणाऱ्या सफाई कर्मचारी, सेवक वर्ग तसेच सुरक्षारक्षक बंधू-भगिनींच्या हस्ते भक्तिभावाने संपन्न झाली. महापौर निवासातील दैनंदिन व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी नियमितपणे कार्यरत असलेल्या कर्मचारी व सुरक्षारक्षकांना गणेशोत्सवाच्या आनंदात सहभागी करून घेत महापौर मंजुषा नागपुरे यांनी या उपक्रमातून सेवाभाव आणि सामाजिक सन्मानाची भावना अधोरेखित केली. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे यांनी कर्मचारी व सुरक्षारक्षकांशी संवाद साधून त्यांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. महापौर निवासाची स्वच्छता, देखभाल आणि सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या या कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे त्यांनी कौतुक केले. "शहराची सेवा करणाऱ्या प्रत्येक घटकाचा सन्मान आणि त्यांना सण-उत्सवाच्या आनंदात सहभागी करून घेणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. श्रीगणरायाच्या आशीर्वादाने सर्व कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना उत्तम आरोग्य, सुख-समृद्धी आणि उज्ज्वल भविष्य लाभावे," अशी भावना महापौर मंजुषा नागपुरे यांनी यावेळी व्यक्त केली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने महापौर निवासात झालेल्या या आरतीमुळे कर्मचारी व सुरक्षारक्षक बंधू-भगिनींमध्ये आनंदाचे आणि आपलेपणाचे वातावरण निर्माण झाले.

## भगवान वराह जयंतीनिमित्त पुण्यात भव्य मिरवणूक उत्साहात संपन्न



**पुणे : दैनिक संध्या**

भगवान श्री वराह जयंतीनिमित्त सकल हिंदू समाज, पुणे यांच्या वतीने रविवारी (१३ सप्टेंबर) भवानी पेठ परिसरात भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. कस्तुरे चौक येथून सुरू झालेल्या मिरवणूकीचा समारोप श्री बालाजी मंदिर, भवानी पेठ येथे झाला. ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात निघालेल्या या मिरवणुकीत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. मिरवणुकीदरम्यान भगवान श्री वराह देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी झाली होती. धर्म, संस्कृती आणि सामाजिक एकजुटीचा संदेश देणाऱ्या या सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. भगवान विष्णूंच्या वराह अवताराची कथा पृथ्वीच्या संरक्षणाशी जोडली जाते. या पार्श्वभूमीवर वराह जयंतीच्या माध्यमातून पृथ्वी संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि भूमीच्या महत्त्वाचा संदेश देण्यात आला. वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि जागतिक तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर पृथ्वीचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे आवाहन करण्यात आले. तसेच भूमी संवर्धन आणि सेंद्रिय शेतीचा संकल्प करण्याचा संदेश देण्यात आला.

## आउटडोअर लाईटिंगमध्ये स्टाइल आणि टिकाऊपणाचा संगम




**पुणे : दैनिक संध्या**

घराच्या बाहेरील जागा घराच्या विस्ताराचा भाग म्हणून अधिकाधिक वापरल्या जात असताना, या जागांचे सौंदर्य आणि वातावरण खुलवण्यात प्रकाशयोजनेची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन क्रॉम्पटन ग्रीव्हज कन्झ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने आधुनिक डिझाइन, टिकाऊपणा आणि विश्वासार्ह कार्यक्षमतेचा संगम असलेली 'वॉलस्माईल' आउटडोअर डेको वॉल लाईट रेंज बाजारात सादर केली आहे. आधुनिक बाह्य जागांना प्रीमियम आणि आकर्षक लूक देण्याच्या उद्देशाने ही रेंज विकसित करण्यात आली आहे. बाल्कनी, पोर्च, पूलसाइड एरिया, लॉबी, पार्किंग स्पेस तसेच ॲक्सेंट आणि डिस्प्ले लाईटिंगसाठी या वॉल लाईट्सचा वापर करता येणार आहे. आउटडोअर वापर लक्षात घेऊन या रेंजमध्ये IP54 संरक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे ही रेंज वॉटर रेझिस्टंट असून, 3kV पर्यंतचे सर्ज प्रोटेक्शनही उपलब्ध आहे. याशिवाय आकर्षक बिल्ड, सोपी इन्स्टॉलेशन सुविधा, No UV/IR, CRI >80, दीर्घकाळ टिकणारी कार्यक्षमता आणि BIS Registration यांसारखी वैशिष्ट्ये या उत्पादनांमध्ये आहेत. या रेंजसोबत एक वर्षाची वॉरंटी देण्यात येत आहे. लॉन्चबद्दल बोलताना क्रॉम्पटन ग्रीव्हज कन्झ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडचे बिझनेस युनिट हेड – लाईटिंग, सोलर रूफटॉप आणि वायर्स, शालीन नायक म्हणाले, "क्रॉम्पटनमध्ये आमचा विश्वास आहे की, लाईटिंगचे काम केवळ जागा प्रकाशित करण्यापुरते मर्यादित नसून, त्या जागेचे सौंदर्य, वातावरण आणि अनुभव अधिक समृद्ध करण्याचेही असते. आधुनिक घरांमध्ये आउटडोअर जागांचे महत्त्व वाढत असताना ग्राहकांना डिझाइन, कार्यक्षमता आणि टिकाऊपणा यांचा मेळ साधणारी लाईटिंग सोल्युशन्स अपेक्षित आहेत. वॉलस्माईल आउटडोअर डेको वॉल लाईट रेंजच्या माध्यमातून आम्ही आधुनिक सौंदर्य आणि विश्वासार्ह आउटडोअर कार्यक्षमतेचा संगम साधला आहे. ग्राहकांच्या बदलत्या गरजांना प्रतिसाद देणारी आणि त्यांच्या दैनंदिन जागांना अधिक मूल्य देणारी विचारपूर्वक तयार केलेली लाईटिंग सोल्युशन्स विकसित करण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे लॉन्च प्रतीक आहे."

## पुण्याच्या चारीही दिशांना स्वतंत्र डांबर प्लांट उभारा; महापौर नागपुरे यांचे आयुक्तांना पत्र

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे शहराचा विस्तार आणि रस्त्यांच्या विकासाची गरज पाहता पाच परिमंडळांमध्ये पाच हॉटमिक्स प्लांट उभारणे आवश्यक आहे. सध्या येरवडा येथे एक प्लांट असून, त्यावर ताण येत आहे. तसेच तेथील प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शहराच्या हॉटमिक्स प्लांट उभारण्यासाठी लोकवस्ती नसलेल्या भागात जागा शोधा असे निर्देश महौपार मंजूषा नागपुरे यांनी आयुक्त नवल किशोर राम यांना दिले आहेत. यासंदर्भात त्यांनी पत्र पाठवले आहे. येरवड्यात असलेल्या प्लांटमुळे शहराच्या सर्व भागांत एकाच ठिकाणाहून डांबर वाहून नेण्यात वाहतूक कोंडीमुळे मोठा वेळ जातो. लांब अंतरामुळे डांबराचे तापमान कमी होऊन कामाच्या दर्जावर परिणाम होतो, तसेच पालिकेचा इंधन व वाहतूक खर्चही वाढतो.

# 'समावेश'मधून विद्यार्थ्यांना एआय, डिजिटल कौशल्यांचे प्रशिक्षण

### ब्रिटिश उप-उच्चायुक्तालय अधिकारी जॉन निकेल यांच्या हस्ते एआय व डिजिटल कौशल्य प्रयोगशाळेचे उद्घाटन

■ **पुणे (दै. संध्या)**



ग्रामीण, आदिवासी, दिव्यांग, स्थलांतरित कुटुंबांतील आणि पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यांना भविष्यातील रोजगाराच्या संधींसाठी सज्ज करण्याच्या उद्देशाने 'समावेश' संस्थेने पुण्यात एआय व डिजिटल कौशल्य प्रयोगशाळा सुरू केली आहे. मुंबईतील ब्रिटिश उप-उच्चायुक्तालयातील राजकीय व द्वैपक्षीय व्यवहार विभागाचे प्रमुख जॉन निकेल यांच्या हस्ते नुकतेच प्रयोगशाळेचे उद्घाटन झाले. प्रसंगी 'समावेश'चे संस्थापक प्रविण निकम व सहकारी उपस्थित होते. वेगाने बदलणाऱ्या रोजगारविश्वात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल साक्षरता आणि कामाच्या ठिकाणी आवश्यक कौशल्ये ही केवळ तांत्रिक क्षेत्रापुरती मर्यादित राहिलेली नाहीत. जवळपास प्रत्येक क्षेत्रातील शिक्षण आणि रोजगारासाठी ती महत्त्वाची क्षमता बनली आहे. सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी कोणतीही असो, या कौशल्यांपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याला पोहोचता यावे, या उद्देशाने प्रयोगशाळेची उभारणी करण्यात आली आहे. प्रयोगशाळेच्या उद्घाटनप्रसंगी जॉन निकेल यांनी 'समावेश'च्या टीमशी संवाद साधला. विद्यार्थ्यांची शैक्षणिक व सामाजिक पार्श्वभूमी, उच्च शिक्षण आणि करिअरविषयक आकांक्षा याबाबत त्यांनी माहिती घेतली. संस्थेच्या क्षेत्रीय कामातून समोर येणारे अनुभव आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील बदलते प्रश्न यावरही चर्चा झाली. दीर्घकालीन दृष्टीने ही प्रयोगशाळा केवळ संगणक प्रशिक्षणाची जागा न राहता, विद्यार्थ्यांना शिक्षणातून कौशल्यांकडे, कौशल्यांतून रोजगाराकडे आणि रोजगारातून सामाजिक व आर्थिक गतिशीलतेकडे नेणाऱ्या 'समावेश'च्या व्यापक उपक्रमाचा महत्त्वाचा भाग म्हणून विकसित व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रविण निकम म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवेशात मदत करण्यासह उच्च शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधींना जोडण्यासाठी 'समावेश' संस्था कार्यरत आहे. शाळा, महाविद्यालये, समुदाय आणि शासकीय यंत्रणांसोबत भागीदारी करत संस्था विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शन, करिअर समुपदेशन, मेंटॉरिंग, कौशल्य विकास उपक्रम राबविण्यात येत आहेत. पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील उत्पादन, ऑटोमोबाईल, अभियांत्रिकी, आयटी आणि सेवा क्षेत्रातील संधींचा ग्रामीण, स्थलांतरित व पहिल्या पिढीतील युवकांना लाभ व्हावा, यासाठी संस्था प्रयत्नशील आहे." 'समावेश' एआय आणि डिजिटल कौशल्य प्रयोगशाळा ही विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष हाताळणी-आधारित अनुभव देणारी शिक्षण व कौशल्य विकासाची जागा म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न आहे. येथे विद्यार्थ्यांना पुढील विषयांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांना केवळ डिजिटल साधने उपलब्ध करून देण्याऐवजी त्यांचा वापर करून समस्या सोडवणे, नव्या संधी शोधणे आणि भविष्यातील कार्यक्षेत्रासाठी सज्ज होणे, यावर प्रयोगशाळेत भर दिला जाणार आहे. पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात प्रवेश हा प्रवासाचा शेवट नसून खरी सुरुवात आहे. एआयसारख्या नव्या साधनांची समज आणि बदलत्या कार्यक्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये विकसित झाली पाहिजेत. या लॅबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी आणि भविष्यातील संधी यांच्यातील अंतर कमी करण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेही त्यांनी नमूद केले.

२०११ मध्ये काही युवकांनी सुरू केलेल्या 'रोशनी' या उपक्रमातून 'समावेश'च्या व्यापक संस्थात्मक कार्याची वाटचाल सुरू झाली. आजवर संस्थेने सुमारे ५००० हून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती साहाय्य -सह उच्च शिक्षण, शैक्षणिक संधी मिळविण्यासाठी मार्गदर्शन यासाठी सहाय्य केले आहे. संस्थेशी जोडलेले अनेक विद्यार्थी भारतातील तसेच परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेत आहेत.

**पहिल्या टप्प्यात उपलब्ध होणारे अभ्यासक्रम**

- एआय आणि डिजिटल टूल्स
- एआय ॲक्टिव सिटिझनशिप प्रोग्राम
- एक्सेल आणि डेटा ॲनालिसिस
- कोडिंग आणि प्रोग्रामिंग
- कम्युनिकेशन आणि जॉब रेडिनेस
- डेटा एंट्री आणि डेटा मॅनेजमेंट
- विविध ऑनलाइन कौशल्यविकास अभ्यासक्रम

## 'सेलिब्रिटीज अँड टायकून्स कप'ची घोषणा



■ **पुणे (दै. संध्या)**

क्रिकेट, मनोरंजन आणि उद्योगविश्वाचा अनोखा संगम असलेल्या बहुप्रतीक्षित 'सेलिब्रिटीज अँड टायकून्स कप' (CTC) ची घोषणा मुंबईत आयोजित विशेष पत्रकार परिषदेत करण्यात आली. या पत्रकार परिषदेला अभिनेता सुनील शेट्टी, सोहेल खान, अभिनेत्री दीपली साय्यद, सिद्धांत मोरे आणि हाफिज बेग यांची प्रमुख उपस्थिती होती. DivaTales Events प्रस्तुत 'सेलिब्रिटीज अँड टायकून्स कप'चा मुख्य क्रिकेट सामना ऑक्टोबर महिन्यात पुण्यात आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून सेलिब्रिटीज, उद्योजक, व्यावसायिक आणि क्रिकेटप्रेमींना एका व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. CTC ही केवळ क्रिकेट स्पर्धा नसून क्रिकेट, मनोरंजन आणि बिझनेस नेटवर्किंगचा अनोखा संगम ठरणार आहे. विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्ती या उपक्रमाशी जोडल्या जाणार असून, सेलिब्रिटीजची उपस्थिती हे या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण असणार आहे. या प्रसंगी मुंबई हिरोजचे कर्णधार सुनील शेट्टी, मुंबई हिरोजचे सोहेल खान, CTCच्या ब्रँड ॲम्बेसेडर दीपली साय्यद, ब्रँड आयकॉन सिद्धांत मोरे तसेच CTC आणि DivaTales चे CMD हाफिज बेग यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी Gravity Group चे CMD मीहिर कुलकर्णी, Apli Sakhi च्या संचालिका संगीता तर्डे तसेच Pune Tycoons चे कर्णधार आणि Smita Holidays चे CMD जयंत गोरे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. पत्रकार परिषदेदरम्यान उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाबद्दल उत्साह व्यक्त केला. क्रिकेटच्या माध्यमातून मनोरंजन क्षेत्र आणि उद्योगविश्व यांच्यातील संवाद तसेच परस्पर संबंध अधिक दृढ करणे, हा CTCचा प्रमुख उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेनंतर आता ऑक्टोबरमध्ये पुण्यात होणाऱ्या CTC सामन्याकडे क्रिकेट आणि मनोरंजन क्षेत्राचे लक्ष लागले आहे. सेलिब्रिटीजचा जलवा, क्रिकेटचा थरार आणि मनोरंजनाची रंगत यामुळे हा क्रिकेट महोत्सव संस्मरणीय ठरण्याची अपेक्षा आहे.

## महावितरणकडून अभियंता दिन उत्साहात

### महावितरणच्या अभियंत्यांचे योगदान राज्याच्या प्रगतीला गती देणारे : सीएमडी श्री. लोकेश चंद्र

■ **पुणे (दै. संध्या)**



'अभियांत्रिकी ही केवळ एक नोकरी किंवा व्यवसाय नसून तो देशाच्या प्रगतीचा आणि विकासाचा मुख्य कणा आहे. राज्यातील घरे, व्यवसाय, उद्योग, कृषी अशा ३ कोटींवर ग्राहकांकडे दररोज वीजपुरवठा पोहोचवण्यामागे अभियंत्यांचे कौशल्य व महत्वाचे योगदान आहे. वीजक्षेत्राच्या माध्यमातून महावितरणचे अभियंते राज्याच्या प्रगतीला गती देत आहेत', अशा शब्दांत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी अभियंत्यांच्या योगदानाचा गौरव केला. भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी (दि. १५) 'प्रकाशगड' मुख्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी पाठवलेल्या शुभेच्छा संदेशामध्ये अभियंत्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

ऊर्जा क्षेत्रात सध्या मोठे बदल होत असून हरित ऊर्जा, डिजिटलायझेशन आणि आधुनिक पायाभूत सुविधांवर भर दिला जात आहे. या बदलत्या काळात अभियंत्यांची भूमिका अधिक जबाबदारीची बनली आहे. त्यामुळे नवनवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा. वीजग्राहकांच्या तत्पर सेवेला आणि कामात सुरक्षितता व तांत्रिक उत्कृष्टतेच्या दर्जेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन श्री. लोकेश चंद्र यांनी केले.

यावेळी संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर म्हणाले की, 'महावितरणच्या अभियंत्यांचे कार्यकौशल्य आणि अहोरात्र मेहनत यामुळे महावितरणसह राज्याची प्रगतीकडे वेगाने वाटचाल सुरु आहे. अभियंत्यांच्या याच प्रयत्नांमुळे भविष्यातील हरित क्रांती आणि शून्य प्रदूषणाचे उद्दिष्ट निश्चितपणे साध्य होईल'. संचालक (वाणिज्य) श्री. योगेश गडकरी यांनी महावितरण समोरील बदलत्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अभियंत्यांनी अधिक जोमाने काम करण्याची गरज व्यक्त केली. संचालक (प्रकल्प) श्री. सचिन तालेवार यांनी विविध आघाड्यांवर काम करताना ताण - तणावाचे योग्य व्यवस्थापन करून नोकरी व कुटुंब यांच्यात योग्य समतोल राखण्याचे आवाहन केले. संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार म्हणाले, महावितरणच्या यंदाच्या अभियंता दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे महावितरणच्या अभियंत्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जेचा अंगिकार आणि वीजबचतीचा जागर सुरू केला आहे. या मोहिमेच्या माध्यमातून आपले सगळे अभियंते कृतीतून अभियंता दिवस साजरा करून सामाजिक जबाबदारी देखील निभावत आहेत, असे ते म्हणाले.

यावेळी कार्यकारी संचालक सर्वश्री परेश भागवत, भुजंग खंदारे, दिनेश अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त करीत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला मुख्य अभियंते मनीष वाठ, अंकुर कावळे, ज्ञानेश कुलकर्णी, मंगेश कोहाट, अशोक साळुंखे, संतोष सांगळे, प्रशांत दानोलीकर, पंकज तगलपल्लेवार, सुचित्रा गुजर, कविता घरत यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी केले व आभार मानले.

# भारतीय संस्कृती, वारसा व कलेचा प्रसार जगभर व्हावा

### दिग्पाल लांजेकर यांचे मत; ग्लोबल गणेश फेस्टिव्हलच्या विश्वविनायक प्रदर्शनाचे उद्घाटन

■ **पुणे (दै. संध्या)**



*आपल्या हातांनी आशिर्वाद देणारा बाप्पा असो, की ढोलकी वाजवत आनंद साजरा करणारा, बाप्पाचं प्रत्येक रुप आपल्याला तितकंच मोहून टाकतं! कधी हा बाप्पा कलाकाराला कवेत घेत बांधून ठेवतो, तर कधी तो विश्व व्यापून टाकणारा विश्वविनायक होतो. विघ्नहर्ता, सुखकर्ता अशी बाप्पाची एक ना अनेक रुपं आपल्याला कायमच भावतात. गणपतीच्या अशाच विविध रुपांचं दर्शन होतंय 'विश्वविनायक २०२६' या कलाप्रदर्शनातून...*

अमित फाटक फाउंडेशन, अगस्त्य आर्ट्स, राष्ट्रप्रथम ट्रस्ट आणि सदैव फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या 'ग्लोबल गणेश फेस्टिव्हल २०२६' अंतर्गत 'विश्वविनायक २०२६', भव्य कलाप्रदर्शनाचे उद्घाटन प्रसिद्ध लेखक-दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांच्या हस्ते झाले. घोले रस्त्यावरील राजा रवी वर्मा आर्ट गॅलरीत हे प्रदर्शन १५ ते २० सप्टेंबरदरम्यान सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

या कार्यक्रमावेळी ग्लोबल गणेश फेस्टिव्हलचे अध्यक्ष वैभव वाघ, विश्वस्त अनिरुद्ध येवले व माध्यम सल्लागार जीवराज चोले, चित्रकार रविंद्र देव, बालभारतीच्या किशोर मासिकाचे संपादक किरण केंद्रे, हिंदू युवा प्रबोधिनी संस्थापक अध्यक्ष राजाभाऊ बेंद्रे, मिनुशील सडवेलकर, आर्याबाग सांस्कृतिक परिवाराचे कल्याण तावरे व उपस्थित होते.

दिग्पाल लांजेकर म्हणाले, "भारतीय संस्कृती, गणेशोत्सव आणि पारंपरिक कलांचा जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने योगदान द्यावे. गणेशोत्सवातून कलाकार घडतात, या कलाकारांच्या कलाकृतींचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देणे ही समाजाची जबाबदारी आहे. भारतीय संस्कृती, परंपरा व कलेचा प्रसार जगभर व्हायला हवा. कलाप्रकारांचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होणे आवश्यक आहे. ग्लोबल गणेश फेस्टिव्हलच्या माध्यमातून ही संस्कृती व कला जगभर पोहोचवण्याचे काम होत आहे."

किरण केंद्रे म्हणाले, "सध्या उत्सवावरुन विविध प्रकारचे वाद पेटलेले असताना 'कलायुक्त गणेश' ही काळाची गरज आहे. महाराष्ट्राचा हा उत्सव जगभरात नेणे महत्त्वाचे आहे. गणेशापाशी कलेचा संगम होत असल्याने गणेशोत्सव हे कलेच्या सादरीकरणासाठी अतिशय उत्तम माध्यम आहे. त्यामुळे येत्या काळात अशा प्रकारच्या विधायक उपक्रमांकडे वळायला हवे." वैभव वाघ म्हणाले, "गणपती ही बुद्धी आणि कलेची देवता आहे. चर्चा करण्यापेक्षा कृतीतून व्यक्त होणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळेच कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी आणि कलांचा जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार करण्यासाठी या महोत्सवाला तीन वर्षांपूर्वी सुरुवात केली. विश्वविनायक हा जगाला जोडणारा म्हणून ओळखला जावा. जास्तीत जास्त लोकांनी या महोत्सवाच्या माध्यमातून आपली कला सादर करावी हाच यामागील मुख्य उद्देश आहे."

या प्रदर्शनात विविध कलाप्रकारांची प्रात्यक्षिकेही होणार असून, त्यामध्ये बुधवारी (ता. १६) सायंकाळी ४ वाजता चित्रकार कुडलय्या हिरेमठ यांचे चित्रकला प्रात्यक्षिक, गुरुवारी (ता. १७) सायंकाळी ४ वाजता शिल्पकार नवनाथ फेंगसे यांचे शिल्पकला प्रात्यक्षिक, तर शनिवारी (ता. १९) सायंकाळी ४ वाजता ज्येष्ठ व्यंगचित्रकार वैजनाथ दुलंगे यांचे व्यंगचित्रकला प्रात्यक्षिक होणार आहे. या कलामहोत्सवात लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील कलाकारांना सहभागी होता येणार आहे. वैयक्तिक तसेच सामूहिक सहभागाची सुविधा असून, सहभागी प्रत्येक कलाकाराला विशेष सन्मानपत्र देण्यात येणार आहे.

या प्रदर्शनाचे संयोजन विजय महामुलकर आणि प्रज्ञा कळसकर यांनी केले आहे. उद्घाटनाच्या कार्यक्रमाप्रसंगी रुद्रश्री डान्स अकॅडमीच्या विद्यार्थिनींनी भरतनाट्यम नृत्यातून गणेशवंदना सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी गांधी हिने केले तर आभार श्रीदेवी महामुलकर हिने मानले.

दैनिक संध्या — नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे

### २२ जानेवारीला अभिनेता किरण गायकवाडचं दिग्दर्शकीय पदार्पण




पुणे : दैनिक संध्या

आजवर अनेक मालिका, चित्रपटांतून आपल्या उत्तम अभिनयाचं दर्शन घडवलेला किरण गायकवाड आता दिग्दर्शकीय पाऊल टाकत आहे. किरणनं दिग्दर्शित केलेला "F.I.R.NO. 469" थ्रिलर चित्रपट २२ जानेवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. चित्रपटाचं पोस्टर लाँच करण्यात आलं आहे. बिग ब्रेन प्रॉडक्शन्स, आनंदी एंटरटेनमेंट यांनी "F.I.R. NO 469" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. निलेश राठी आणि प्राची राऊत, सचिन अग्रवाल चित्रपटाचे निर्माता, अर्चना नरेश भुतडा या सहनिर्मात्या, तर त्र्यंबक डागा, मोहसीन खान सहयोगी निर्माता आहेत. किरण गायकवाड यांनी चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन, तर योगेश कोळी यांनी छायांकन केलं आहे. चित्रपटात तगडी स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे. अभिनेता नचिकेत पूर्णपात्रे, प्रसाद ओक अभिनेत्री अमृता धोंगडे, राहुल मगदूम, निखिल चव्हाण, हार्दिक जोशी, अंकिता लांडे, देवेंद्र गायकवाड, रमेश परदेशी, सुहास शिरसाट, योगेश शिरसाट, चेतन चावडा, अंजली जोगळेकर, अंकुश मांडेकर, मीरा सारंग, चेतन रायकर यांच्या भूमिका आहेत. एका सर्वसामान्य नागरिकाची गोष्ट "F.I.R. NO. 469" या चित्रपटात आहे. सत्ता, राजकारण, पैसा गुन्हा, पोलिस प्रक्रिया, प्रशासन यात अडकत गेलेल्या माणसाची सस्पेन्स, थ्रिलर अशा प्रकारची गोष्ट या चित्रपटात मांडण्यात आली आहे. चित्रपटाच्या पोस्टरमधूनही गोष्टीविषयीची उत्सुकता वाढत आहे. पोलिस स्टेशन दिल एका बाकड्यावर बसलेला सर्वसामान्य माणूस, त्याची हतबलता, मागे भिंतीवर सत्यमेव जयते लिहिलेले दिसते. चित्रपटाविषयी किरण म्हणतो, एका कॉमन मॅनची गोष्ट "F.I.R. NO. 469" या चित्रपटात आहे. अत्यंत नाट्यमय घटना-घडामोडींतून ही गोष्ट उलगडत जाते. समाजातील वेगवेगळे पदर त्यातून कळत जातात. त्यामुळे नक्कीच प्रेक्षक या गोष्टीत गुंततील अशा प्रकारे मांडणी करण्यात आली आहे.

### वन राइड २०२६: स्नो लेपर्डसाठी राइड करण्याचे अंतिम आवाहन

पुणे : दैनिक संध्या

रॉयल एनफिल्डचे प्युअर मोटरसायकलिंगचे वार्षिक जागतिक सेलिब्रेशन वन राइडसाठी जगभरातील हजारो रायडर्स रस्त्यावर उतरतील. २०११ पासून, वन राइडने विविध देश आणि खंडांमधील रायडर्सना एकाच दिवशी रायडिंगच्या साध्या आनंदात एकत्र आणले आहे. या वर्षी रॉयल एनफिल्ड आपल्या १२५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधत ही राइड ६० देशांमध्ये १,६०० हून अधिक राइड्समध्ये आयोजित केली जाईल, जिथे मोटरसायकलिंगच्या सामायिक प्रेमाने आणि वर्ष २०२६ साठी या प्रवासांना शक्य करणाऱ्या ठिकाणांप्रती असलेल्या सामायिक जबाबदारीतून साकारलेली ही जागतिक एकत्रता असेल. "प्रत्येक रायडर. प्रत्येक रस्ता. एक मिशन." (एव्हरी रायडर. एव्हरी रोड. वन मिशन.) या आवाहनांतर्गत वन राइड २०२६ उंच पर्वतरांगांमधील प्रमुख प्रजाती आणि या भूभागाचे चिरंतन प्रतीक असलेल्या हिमबिबट्याला (स्नो लेपर्ड) समर्पित आहे. हिमालय रॉयल एनफिल्डचे आध्यात्मिक घर मानले जाते, ज्याची अनेक पिढ्यांच्या रायडर्सनी भटकंती केली असून ते कंपनीच्या मोटरसायकल संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिले आहे. वन राइड २०२६ मध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक रायडरमागे रॉयल एनफिल्ड हिमबिबट्यांच्या संवर्धनासाठी योगदान देईल, जिथे पर्वतांसोबतचे नाते हे त्यांच्या जतनाची जबाबदारीही सोबत आणते, याची कंपनीला पूर्ण जाणीव आहे. हा उपक्रम रॉयल एनफिल्ड सोशल मिशनद्वारे आधीच सुरू असलेल्या संवर्धन कार्यावर आधारित आहे. कंपनीचे समुदाय संवर्धन प्रकल्प हिमाचल प्रदेश, लडाख, उत्तराखंड, सिक्कीम आणि जम्मू-काश्मीरमध्ये पसरलेले आहेत , जे हिमबिबट्यांच्या १०,५०० चौरस किमीपेक्षा जास्त अधिवासाला व्यापतात, त्यापैकी ५३ चौरस किमी क्षेत्र त्यांच्या समुदाय संवर्धन उपक्रमांतर्गत आणले गेले आहे.

### इमारत विकणे आहे

जय बजरंग नागरी सहकारी पतसंस्था मर्या, ओतुरची होळी चौक, पाटील बोळ सि. स. नं. ४१३ ग्रामपंचायत मि.नं. ०३८९/ब/3 ही जुनी इमारत विकणे आहे.

अधिक माहितीसाठी संस्था कार्यालयात संपर्क करावा.

इच्छुक व्यक्तींनी आपली निविदा जाहीरात प्रसिध्दी पासून ७ दिवसांचे आत संस्था कार्यालयात जमा करावी. कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार संस्था राखून ठेवीत आहे.

चेअरमन
जय बजरंग नागरी सह.
पतसंस्था, ओतूर.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक (१) श्री. संतोष सखाराम भोर, पत्ता : मु. पो. जोरे मळा (भोरवाडी), येडगाव, ता. जुन्नर, जि- पुणे, ४१०५०४. हे असून यांना सदर मिळकतीचा वाटेल त्या प्रकारे विल्हेवाट लावण्याचा हक्क व अधिकार असून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना हस्तांतरण करण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचा पूर्ण भरवसा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि सदर मिळकतीवर त्यांचेशिवाय इतर कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, ताबा, वहिवाट वगैरे नाही तसेच सदर मिळकत त्यांनी कोणासही गहाण, दान, लीज, बक्षीस, करार- मदार पोटगी, खरेदी वगैरे स्वरुपात तबदील केलेली नाही व तश्या प्रकारचे हक्क व अधिकार इतर कुठल्याही व्यक्तीस नाहीत. यदा कदाचित सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क व अधिकार वा बोजा वा करार-मदार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील पत्यावर योग्य त्या कागदपत्रानिशी प्रत्यक्ष भेटून खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरील मिळकत हि निर्वेध व निजोखमी असून त्यावर कोणाचाही, कसलाही हक्क व अधिकार नाही व असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील व नंतर, कोणाच्याही, कोणत्याही तक्रारीची/हरकतीची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ठ : तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका जुन्नर, पंचायत समिती जुन्नर, जिल्हा परिषद पुणे, मे. दुय्यम निबंधक साहेब, नारायणगाव यांचे हद्दीतील गाव मौजे भोरवाडी (येडगाव) येथील खाते क्र. १६२, गट नं. ५७/३, यांसी एकूण शेतजमीन एकूण क्षेत्र ०.४६.०० पो. ख. ०.०४.०० असे एकूण ०.५०.०० (हे.आर.चौ.मी.) यापैकी सदर क्षेत्रातील आमचे अशिलांना पूर्वेकडून रस्त्याच्या बाजूने कायमस्वरूपी खरेदी देत/ विक्री करत असलेले रस्तासोडून क्षेत्र ०.३५.०० (हे. आर. चौ. मी) अशी चतु:सीमा मिळकत

श्री. कुलदीप शरद नलावडे, ॲडव्होकेट
श्रीकृष्ण बिल्डिंग, आळेकर मार्केट, तळमजला,
एसटी डेपो जवळ, नारायणगाव, ता.जुन्नर, जि. पुणे,
पिन कोड -४१०५०४. मो.नं. ९४२२४९४१६१

# भारताच्या नेक्स्ट-जेन स्पेस इनोव्हेटर्सची जडणघडण

■ पुणे (दै. संध्या)

10 सप्टेंबर 2026— ला फाऊंडेशन डसॉल्ट सिस्टिम्स, इंडियाने आज त्यांच्या "माय फर्स्ट एरोस्पेस प्रोग्राम" या महत्त्वपूर्ण STEM उपक्रमाच्या अंतिम टप्प्याची घोषणा केली; या उपक्रमाची सांगता पुण्यात होत आहे. तरुण पिढीला घडवण्यासाठी आणि अंतराळ क्षेत्राबाबत तसेच त्यासंबंधीच्या वाढत्या शैक्षणिक संधींविषयी त्यांच्यात कुतूहल जागृत करण्यासाठी हा उपक्रम आखण्यात आला होता. अनेक शहरांमध्ये राबवल्या गेलेल्या या उपक्रमाने बेंगळुरू, चेन्नई, गुरुग्राम आणि पुणे या चार प्रमुख तंत्रज्ञान केंद्रांमधील 13 ते 16 वयोगटातील 150 शालेय विद्यार्थ्यांना प्रेरित केले आहे.

अंतराळ क्षेत्रात कार्यरत असलेली सोसायटी फॉर स्पेस एज्युकेशन रिसर्च अँड डेव्हलपमेंट (SSERD) या ना-नफा तत्त्वावर चालणाऱ्या संस्थेच्या सहकार्याने ला फाऊंडेशन डसॉल्ट सिस्टिम्स, इंडिया हा उपक्रम राबवते आहे.

संपूर्ण भारतात हा उपक्रम एक अनुभवात्मक शैक्षणिक मार्ग उपलब्ध करून देतो, जो विद्यार्थ्यांना एका नियोजनबद्ध मार्गाने मार्गदर्शन करतो. डसॉल्ट सिस्टिम्सच्या कुशल स्वयंसेवकांच्या मदतीने, मूलभूत STEM संकल्पना समजून घेण्यापासून ते त्यांच्या कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी 3D तंत्रज्ञानाचा वापर करण्यापर्यंत सहभागी प्रगती करतात.

प्रत्यक्ष कृतीतून शिकणे आणि आभासी पडताळणी यांचा मेळ घालून, विद्यार्थी रॉकेटरी, उपग्रह आणि रोव्हरशी संबंधित संपूर्ण उपक्रमांद्वारे महत्त्वपूर्ण समस्या-निवारण, सर्जनशीलता आणि सहयोगी अभियांत्रिकी कौशल्ये विकसित करतात. हा उपक्रम म्हणजे ला फॉन्डेशन डसॉल्ट सिस्टेम्सचा पाया आहे. ही भारतातील एक व्यापक शैक्षणिक परिसंस्था असून, ती भारतातील विकसित होत असलेल्या अवकाश परिसंस्थेमध्ये प्राथमिक शालेय शिक्षणाला उच्च-स्तरीय उद्योग सज्जता कार्यक्रमांशी जोडण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

"विज्ञान आणि अभियांत्रिकीमधील जिज्ञासेचे सुरुवातीपासून संगोपन करणे हे अंतराळ क्षेत्रात भारताची प्रगती टिकवून ठेवण्यासाठी अत्यावश्यक आहे. कनेक्टनेक्स्ट-इंडस्ट्री रेडीनेस फॉर स्पेस आणि क्यूबसॅट डिझाइन अँड डेव्हलपमेंट अशा विद्यापीठाच्या उपक्रमांशी शालेय शिक्षणाला जोडून, आम्ही विविध शाखांमधील विद्यार्थी आणि शिक्षकांना देशाच्या अंतराळविषयक महत्त्वाकांक्षांमध्ये सक्रियपणे योगदान देण्यासाठी सक्षम करत आहोत," असे ला फाँडेशन डसॉल्ट सिस्टेम्स, इंडियाच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष सुदर्शन मोगासाले म्हणाले.



भारताचे अंतराळातील भविष्य हे शालेय वर्गांमध्येच घडवले जाईल, यावर आमचा विश्वास आहे. 'माय फर्स्ट एरोस्पेस प्रोग्राम' हे सिद्ध करतो की, जेव्हा आपण १३ वर्षांच्या मुलाला रॉकेट किंवा क्यूबसॅट बनवण्याची साधने देतो, तेव्हा आपण केवळ STEM शिकवत नाही, तर आपण त्यांच्या करिअरला चालना देत असतो. तसेच त्यांना शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी एक प्रबळ प्रेरणा देतो. त्याच वेळी, आपण कौशल्ये विकसित करत आहोत आणि न्यूस्पेस इंडियासाठी प्रतिभावान मनुष्यबळ तयार करत आहोत," असे सोसायटी फॉर स्पेस एज्युकेशन, रिसर्च अँड डेव्हलपमेंटच्या (एसएसईआरडी) सह-संस्थापक आणि विश्वस्त निखिता चड्डे म्हणाल्या. शालेय शिक्षणापलीकडे, ला फाँडेशन डसॉल्ट सिस्टेम्स, अवकाश क्षेत्रात उच्च शिक्षणाचा सहभाग अधिक दृढ करत आहे. आपल्या कनेक्टनेक्स्ट-इंडस्ट्री रेडीनेस फॉर स्पेस या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, ही संस्था तांत्रिक प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाद्वारे पदवीपूर्व विद्यार्थी आणि शिक्षकांना राष्ट्रीय कॅनसॅट व मॉडेल रॉकेट्री स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास सक्षम करते. तसेच, ही संस्था पदवीपूर्व विद्यार्थ्यांना व्हर्च्युअल ट्विन तंत्रज्ञानाचा वापर करून अवकाश मोहिमांचे अभियांत्रिकी आणि क्यूबसॅट्सची रचना करण्यासाठी भविष्यासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करते.

## 'टेक फॉर गुड' ही परिषद डिजिटल युगात दिशादर्शक : डॉ. मारवा

■ पिंपरी (दै. संध्या)

'टेक फॉर गुड' ही परिषद डिजिटल युगात दिशादर्शक आहे. या परिषदेच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा वापर समाजोपयोगी परिवर्तनासाठी झाला पाहिजे. केंद्र सरकारच्या उद्योग पूरक धोरणामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमी कंडक्टर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारत देश वेगाने प्रगती करत आहे. नवीन गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या उद्योजकांबरोबरच युवा अभियंते आणि संशोधकांना या क्षेत्रात खूप संधी उपलब्ध होत आहेत. याचा उपयोग आपले उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी आणि देशाच्या विकास दरात वृद्धि करण्यासाठी अभियंत्यांनी करून घ्यावा असे मार्गदर्शन केंद्रीय मंत्रालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी वरिष्ठ अधिकारी डॉ. सुधीर कुमार मारवा यांनी केले.




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये आयईईई पुणे सेक्शनच्या तांत्रिक प्रायोजकत्वाने तसेच आयईईई सिग्नल प्रोसेसिंग सोसायटी, पुणे चॅप्टर यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या 'टेक फॉर गुड : बिल्डिंग अ बेटर डिजिटल वर्ल्ड' या संकल्पनेवर आधारित १० व्या आयईईई आयसीसीयूबीईए २०२६ आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप सत्रात डॉ. मारवा यांनी मार्गदर्शन केले.

## चाकणला गौराईंचे मुखवटे खरेदीसाठी विवाहितांची झुंबड

■ चाकण (दै. संध्या)

गणरायाच्या आगमनानंतर दाखल होणाऱ्या गौराईंचे मुखवटे खरेदीसाठी विवाहित महिलांची चाकण येथील बाजारपेठेत झुंबड उडाली आहे. गौराईंना सजविण्यासाठी गौरीच्या मूर्ती, मुखवटे, दागिने व साड्या आणि सजावट साहित्यांनी चाकण बाजारपेठ फुलून गेली आहे.

गौराईंचे आगमन मोजक्याच काही दिवसांवर आले असून, तिच्या स्वागतासाठी आकर्षक सजावटीचे साहित्य खरेदीसाठी महिलांची चाकण बाजारात गर्दी होत आहे. दोन, तीन हजार रुपयापर्यंत देवीचे मुखवटे व सजावटीचे साहित्य उपलब्ध आहेत. गौरी मुखवटे व सजावटीच्या साहित्यास यंदा चांगला उठाव असल्याचे गौराई मूर्तींचे विक्रेते अश्विनी जगनाडे यांनी सांगितले. गौरीची स्थापना महिला मोठ्या भक्तिभावाने करतात. ज्येष्ठगौरी अनुराधा नक्षत्रात येतात. गणपतीचे आगमन झाल्यानंतर गौराईंची सजावट महिला मोठ्या भक्ती भावाने करतात.



चाकण बाजारात सध्या गौराईंचे शाडूचे, पीओपी, पितळी, कापडाचे, फायबरचे असे विविध प्रकारचे मुखवटे पाहावयास मिळत आहेत. काही भागात महिला फक्त मुखवट्याची पूजा करतात. तर काही भागात उभ्या गौराईंची पूजा केली जाते. गौरीच्या दागिन्यांबद्दल महिला चिकित्सक असतात. त्यांना दरवर्षी नवीन काहीतरी हवे असते. त्यामुळे आम्ही आवर्जून नवनवीन प्रकारातील दागिने आणतो. पारंपरिक दागिन्यांना आणि टेम्पल ज्वेलरीला महिलांची प्रचंड मागणी आहे." असे यांनी अश्विनी जगनाडे, मुखवटे विक्रेत्या, चाकण सांगितले.

## जैन पर्युषण पर्व समाप्ती निमित्त जैन बांधवांनी सर्व जीवांशी केली क्षमा याचना

■ पुणे (दै. संध्या)

आज जैन बांधवांचा " पर्युषण पर्व " चा शेवटचा दिवस. सर्व जैन बांधव आपली प्रतिष्ठाने, दुकाने बंद ठेऊन मंदिरात जाऊन सुमारे ३ तास जैन साधू, साध्वीजी यांच्या उपस्थितीत नवकार महामंत्रचा जाप करण्यात आले ज्याला जैन शब्दात " संवत्सरी प्रतिक्रमण " असे म्हणतात. हा प्रतिक्रमण म्हणजे आत्मपरीक्षण आणि पश्चात्ताप करण्याची धार्मिक विधी किव्हा प्रक्रिया असे म्हंटले जाते.आपल्याकडून कळत नकळत गेले वर्षभरात घडलेल्या चुकांची क्षमा, मन निर्मळ करणें, व पुढे तशा आपल्या हाथून चुका न करण्याचा संकल्प केले जाते. शरीराचे भान विसरून ध्यान केले जाते. आपल्या कडून कोणाची निंदा करण्यात आली असेल, कोण्हाचे मन दुखावले असेल प्रत्येक प्राणी, जीवांची क्षमा मागितली जाते. सर्व जैनबांधव हाथ जोडून " मिच्छामी दुक्कडम " म्हणत क्षमा याचना करतात. संवत्सरी प्रतिक्रमण समाप्त होताच सर्व जैन बांधवांनी अनेक जैन मंदिरात जाऊन गुरु भगवंतांचे घेतले दर्शन. श्री आदिश्वर महाराज जैन मंदिरात




भगवान महावीर यांची भव्य ५ फुटी रांगोळी काढण्यात आली. जैन बांधवांनी मंदिरात आवर्जून उपस्थित राहून भगवान महावीराची दर्शन घेत आपल्या हाथून झालेल्या अनेक काळात नकळत चुकांची मिच्छामी दुक्कडम म्हणत क्षमा मागितली.

## 'तीर्थ स्थान वंदन निमित्ताने मोटरसायकल यात्रेच' आयोजन

■ कोरेगावमुळ(दै. संध्या)

परब्रह्म प्रतिष्ठान महानुभाव पुणे यांच्या वतीने पुणे, फलटण, सातारा, पोगरवाडी, चंदनवंदन व सौरंगा आदी तीर्थक्षेत्रांचा समावेश असलेली 'तीर्थस्थानवंदन मोटरसायकल यात्रा' आयोजित करण्यात आली आहे.

या यात्रेचा शुभारंभ शुक्रवार, दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी हवेली तालुक्यातील कोरेगावमूळ येथून होणार असून यात्रेचा समारोप सोमवार, दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी शिक्रापूर येथे होणार आहे. या यात्रेदरम्यान विविध महानुभाव तीर्थस्थाने, मंदिरे व धार्मिक स्थळांना भेट देऊन दर्शन, पूजन, आरती तसेच धार्मिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यात येणार आहे. यात्रेच्या नियोजनानुसार सातारा व पुणे जिल्ह्यातील विविध परिसरातून यात्रा मार्गक्रमण करणार आहे.

२६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या यात्रेत महानुभाव संप्रदायातील संत-महंत, आचार्यगण, भाविक व भक्त सहभागी होणार आहेत.

यात्रेच्या माध्यमातून धार्मिक परंपरा, तीर्थस्थानांचे महत्त्व आणि महानुभाव संप्रदायाची आध्यात्मिक विचारधारा जनमानसापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी परब्रह्म प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सर्व पदाधिकारी, सेवेकरी व सहकारी नियोजनबद्ध पद्धतीने कार्यरत असून, सहभागी भाविकांनी आयोजकांनी दिलेल्या नियमावलीचे पालन करून यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन परब्रह्म प्रतिष्ठान महानुभाव, पुणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राजगुरुनगर शहरात गणरायाचे शांततापूर्ण वातावरणात आगमन

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर शहरात गणरायाचे मोठ्या उत्साहात, भक्तिमय आणि शांततापूर्ण वातावरणात आगमन झाले. 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने शहरातील विविध भाग दुमदुमून गेले. घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक पद्धतीने बाप्पाची प्रतिष्ठापना केली.

गणरायाच्या आगमनासाठी शहरातील गणेशभक्तांनी गेल्या काही दिवसांपासून जय्यत तयारी केली होती. घरगुती गणपतींच्या मूर्ती घेण्यासाठी नागरिकांची बाजारपेठेत मोठी गर्दी झाली होती. विविध आकार व आकर्षक स्वरूपातील गणेशमूर्तींची भक्तिभावाने खरेदी करून वाजतगाजत बाप्पाला घरी आणण्यात आले.

यंदा घरगुती गणपती साठी एक ते दीड फुटापर्यंतच्या गणेशमूर्तींना मोठी मागणी होती. पुण्यातील प्रसिद्ध दगडूशेठ, लालबागचा राजा, रंगीत फेटा परिधान केलेल्या आकर्षक मूर्ती, विविध टेन्टमधील देखाव्यांवर आधारित मूर्ती तसेच 'बेबी डॉल' स्वरूपातील गणेशमूर्तींना गणेशभक्तांची विशेष पसंती मिळाली. घरगुती गणेशमूर्तींच्या आगमना पूर्वी गणेशभक्तांनी लाडक्या बाप्पाच्या सजावटी साठी जय्यत तयारी केली होती.शहरातील प्रत्येक भागात सजावट साहित्याचे दुकाने उजळून निघाल्या होत्या.तयार सजावटीचे साहित्यापासून विविध रंगातील कृत्रिम फुले, वेली,तोरणे, लटकन,झुंबर,विविध रंगातील लाईटच्या माळा,तसेच पडदे,मावळे अशा अनेक प्रकारचे साहित्य उपलब्ध झाले होते. गणेशोत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये तसेच गणेशभक्तांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासन आणि पोलिसांकडून आवश्यक नियोजन करण्यात आले होते. गणपती आगमन व विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी करून संभाव्य अडथळे दूर करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या होत्या. शहरात गणरायाचे आगमन शांततेत पार पडावे यासाठी नागरिक, गणेश मंडळांचे कार्यकर्ते आणि प्रशासन यांनी समन्वयाने काम केले.



## थोडक्यात पण महत्वाचे



### पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शासकीय सदस्यपदी अण्णा बनसोडे यांची निवड

**पिंपरी : दैनिक संध्या**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण क्षेत्रात सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी स्थापन केलेल्या ऐतिहासिक पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शासकीय सदस्यपदी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष तथा आमदार अण्णा बनसोडे यांची निवड झाली आहे. या गौरवपूर्ण नियुक्तीबद्दल पिंपरी-चिंचवड शहरातील विविध सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी पिंपरी येथील जनसंपर्क कार्यालयात भेट देत त्यांचा उत्साहात सत्कार केला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी पुष्पगुच्छ, शाल आणि शुभेच्छा देऊन अण्णा बनसोडे यांचे अभिनंदन केले. पिंपरी-चिंचवडचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधीची अशा ऐतिहासिक आणि प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेवर झालेली नियुक्ती शहरासाठी अभिमानास्पद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. सत्कार कार्यक्रमात रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीचे नेते राहुल डंबाळे, रिपब्लिकन पक्षाचे नेते सुरेश निकाळजे, लढा युथ मूव्हमेंटचे प्रमोद क्षिररसागर, अंजना गायकवाड, माधव मुळे, स्वप्निल रोकडे, राहुल सोनवणे, संदीप पिसाळ यांच्यासह सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित, बहुजन आणि दुर्बल घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली होती. या संस्थेने देशातील लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. अशा संस्थेच्या शासकीय सदस्यपदी अण्णा बनसोडे यांची निवड होणे ही पिंपरी-चिंचवडसाठी गौरवाची बाब असल्याचे मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. दरम्यान, या नियुक्तीच्या पार्श्वभूमीवर पुढील आठवड्यात शहरात भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी 'विधानसभा उपाध्यक्ष माननीय आमदार अण्णा बनसोडे गौरव समिती' स्थापन करण्यात आली असून समितीच्या वतीने मोठ्या प्रमाणावर सर्वसमावेशक कार्यक्रमाचे नियोजन सुरू आहे. कार्यक्रमाची तारीख, वेळ आणि स्थळ लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. अण्णा बनसोडे यांच्या या नियुक्तीमुळे शिक्षण क्षेत्रातील सामाजिक बांधिलकी अधिक बळकट होईल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचारांचा वारसा अधिक प्रभावीपणे पुढे नेला जाईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

### विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशनतर्फे पर्यावरणपूरक गणेश विसर्जन घाट सज्ज

**पिंपरी : दैनिक संध्या**

गणेशोत्सव हा श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचा सण आहे. मात्र, या भक्तीसोबत पर्यावरणाचे रक्षण आणि सामाजिक बांधिलकी जपणे हीदेखील आपली सामूहिक जबाबदारी आहे. याच सामाजिक आणि पर्यावरणपूरक विचारातून विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशन यांच्या वतीने वाकड येथे पर्यावरणपूरक श्री गणेश विसर्जन घाट २०२६ उभारण्यात आला आहे. द्रौपदा मंगल कार्यालयाजवळ, कस्तुरी चौक, हिंजवडी रोड, वाकड येथे उभारण्यात आलेला हा घाट १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सकाळी १० ते रात्री १० या वेळेत गणेशभक्तांसाठी उपलब्ध राहणार आहे. या घाटावर ५ फूट उंचीपर्यंतच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनाची तसेच मूर्तीदानाची सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नदी, नाले, ओढे व विहिरी यामध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन होऊन जलस्रोतांचे प्रदूषण होऊ नये, तसेच पर्यावरणाची हानी टाळता यावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे घाटावर विसर्जित अथवा दान केलेल्या गणेशमूर्तींचे श्री फाऊंडेशन पुणे या संस्थेमार्फत संकलन करण्यात येणार आहे. या मूर्तींचे पुनःश्रृंगार करून त्यांचा योग्य पद्धतीने उपयोग केला जाणार आहे. तसेच मूर्तीदान योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीद्वारे अनाथ मुलांच्या शिक्षणासह त्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी मदत केली जाणार आहे. त्यामुळे एका गणेशमूर्तीच्या विसर्जनातून पर्यावरणाचे संवर्धन आणि समाजातील गरजू मुलांच्या भविष्यासाठी मदत, असा दुहेरी सामाजिक संदेश या उपक्रमातून दिला जात आहे. घाटावर भाविकांसाठी आरती व्यवस्था, निर्माल्य कुंड, प्रकाश व्यवस्था यांसह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वाकड, पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील नागरिकांनी आपल्या घरगुती, सोसायटीतील तसेच सार्वजनिक गणेश मंडळांच्या शाडू मातीच्या आणि POPच्या गणेशमूर्तींचे विसर्जन पर्यावरणपूरक पद्धतीने याच घाटावर करावे, असे आवाहन विशालभाऊ वाकडकर सोशल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. नागरिकांनी गुलाल व रंगांचा वापर टाळावा, निर्माल्य केवळ निर्माल्य कुंडात जमा करावे आणि प्लास्टिकचा वापर टाळून स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### निगडीत कचरा वाहतूक करणाऱ्या डंपरच्या धडकेत पाच वर्षीय चिमुरडीचा मृत्यू



**पिंपरी : दैनिक संध्या**

निगडी येथील साईनाथनगर परिसरात कचरा संकलनासाठी आलेल्या डंपरच्या धडकेत चिरडून पाच वर्षीय चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि. 14) दुपारी घडली. या घटनेनंतर वाहन चालकास वाहनासह ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. 14 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी सुमारे 12.10 वाजण्याच्या सुमारास औदुंबर सोसायटीसमोर, साईनाथनगर, निगडी येथे महिंद्रा सुप्रो कचरा संकलन वाहन (क्र. MH-14-HG-7123) कचरा संकलनासाठी आले होते. यावेळी वाहनाची रस्त्याच्या कडेला उभी असलेल्या दुचाकीला धडक बसली. धडकेमुळे दुचाकीचा आघात कु. संस्कृती भागवत बिरादार (वय 5 वर्षे, रा. औदुंबर सोसायटी, यमुनानगर, निगडी) हिला लागला. त्यामुळे ती वाहनाखाली आल्याने गंभीर जखमी झाली. घटनेनंतर तातडीने तिला उपचारासाठी निगडी येथील लोकमान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणी करून तिला मृत घोषित केले. अपघातानंतर महिंद्रा सुप्रो वाहन व त्याचा चालक राहुल प्रल्हाद चव्हाण (वय 28 वर्षे, रा. साने चौक, चिखली) तसेच त्याच्यासोबत असलेला राजू कुमार गायकवाड (वय 38 वर्षे, रा. राजनगर, ओटास्कीम, निगडी) यांना वाहनासह ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी अपघातास कारणीभूत ठरलेल्या चालक व संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू असून पोलिसांकडून पुढील तपास केला जात आहे. या दुर्दैवी घटनेमुळे साईनाथनगर व यमुनानगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये बाप्पाचे जल्लोषात आगमन!

**■ पिंपरी : (दै. संध्या)**

ढोल-ताशांचा गजर... नृत्यात तल्लीन झालेले भक्त...'गणपती बाप्पा मोरया- मंगलमूर्ती मोरया'चा जयघोष... अशा मंगलमय आणि उल्हासपूर्ण वातावरणात गणरायाचे सोमवार (दि. १४) आगमन झाले. घराघरांत आणि सार्वजनिक मंडळात बाप्पाचे थाटात स्वागत करण्यात आले. 'तालबद्ध लेझीम पथके, फुलांच्या पाकळ्यांची मुक्तहस्ते उधळण आणि गणेशभक्तांचा अमाप उत्साह.. अशा उत्साही वातावरणात घरोघरी व मंडळामध्ये गणरायाच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. पिंपरी-चिंचवड शहरात सोमवारी सकाळपासूनच लाडक्या बाप्पाचे आगमन होणार म्हणून भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांमध्ये श्री गणेशाची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यंदा हरितालिका तृतीया आणि गणेश चतुर्थीचा दुर्मिळ योग आला होता. मूर्तींच्या स्टॉल्सवर गणरायाला घरी आणण्यासाठी गर्दी झाली होती. तसेच बाजारपेठातही खरेदीसाठी गर्दी झाली होती. घरोघरी गणरायाचं वाजतगाजत आगमन झालं. सार्वजनिक मंडळांपासून घराघरांत आकर्षक देखाव्यात आणि मखरात गणराज विराजमान झाले असून, यंदा बारा दिवसांच्या या उत्साहपर्वाला सोमवारपासून सुरुवात झाली आहे. शहरात सकाळपासून गणेशमूर्ती घरी नेण्यासाठी बाजारपेठेत नागरिक व मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. दुपारी बारा वाजेपासून तर तरुणाईचा उत्साह शिगेला पोचला होता. ढोल-ताशांचा गजर आणि लेझीमच्या तालावर



थिरकणाऱ्या मिरवणुकांनी वातावरण जल्लोषमय झाले होते. गणरायाच्या प्रतीक्षेत असलेल्या भक्तांची लगबग सुरू होती. घराघरांमध्ये बाप्पांच्या स्वागतासाठी अबालवृद्धांपासून सर्वांचीच जय्यत तयारी सुरू होती. मंत्रोच्चार तसेच आरत्यांचे स्वर घराघरांतून ऐकू येत होते. घरोघरी दुपारपर्यंत गणरायाची विधिवत स्थापना करण्यात आली होती. पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, निगडी, भोसरी, कासारवाडी, दापोडी परिसरात गणेशमूर्ती घेण्यासाठी भाविक सहकुटुंब आल्याचे दिसून येत होते. बाप्पाला घरी नेण्यासाठी खास पारंपरिक पोषाख परिधान केलेले अनेक कुटुंबीय दिसून आले.महिलांनी आणि कुमारिकांनी आज मनोभावे हरितालिकेचे व्रत केले. चांगला पती मिळावा म्हणून मुलीही हरितालिकेचे व्रत करतात. गणेश चतुर्थी आणि हरितालिका तृतीया या दोन्ही तिथी एकाच दिवशी आल्याने महिलांनी सकाळी हरितालिकेची पूजा केली. 'हरितालिका' या अनेक वर्षांपासून चालत आलेल्या या परंपरागत व्रताचे महत्त्व आजही टिकून आहे. 'शिवडी' या फुलाला हरतालिकेच्या पूजेमध्ये महत्त्वातचे स्थान असल्यामुळे बाजारामध्ये ही फुले मोठ्या प्रमाणात उपलब्ध होती. हरितालिकेच्या व्रतासाठी महिलांनी महादेवाच्या मंदिरांमध्ये, तर काहींनी घरामध्ये वाळूची पिंड तयार करून त्याची पूजा केली. गणेशोत्सव हा चिमुकल्यांचा अधिक आवडता सण. 'मोरया' अक्षरे लिहिलेल्या पट्ट्या कपाळावर बांधून लाडक्या बाप्पांना आणण्यासाठी चिमुकल्यांची लगबग दिसून येत होती. मूर्ती घेतल्यापासून घरी येईपर्यंत 'गणपती बाप्पा मोरया'चा अखंड गजर चिमुकले करत होते. महिला व मुलींचा सहभागही लक्षणीय होता.

गणरायाला घरी आणण्यासाठी महिलांची गणेश चतुर्थीच्या पूर्वसंध्येपासून लबगब सुरू होती. सोमवारी सकाळीदेखील गणपती आगमनासाठी महिला पारंपरिक वेशभूषेत गणरायाचे स्वागत करण्यास सज्ज होत्या. त्यांच्याबरोबर घरातील लहान मुलीदेखील रेडिमेड नऊवारी, नथ, माळा घालून नटून-थटून सज्ज झाल्या होत्या.

बाप्पाला नैवेद्य म्हणून घरोघरी बनविण्यात आलेल्या मोदकांचा दरवळ सुटला होता. प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर चिमुकल्यांनी मोदकांवर यथेच्छ ताव मारला. सोमवारपासून बारा दिवस वेगवेगळ्या प्रकारचे मोदक खायला मिळणार यामुळे बच्चेकंपनी खुशीत दिसत होती. सकाळपासून गणपतीची मूर्ती तसेच विविध पूजा साहित्य नेण्यासाठी बाजार परिसरात गर्दी केल्यामुळे वाहतुकीची कोंडी झाली होती.



## वृद्धाश्रमात वाढदिवस साजरा करत उद्योजक सागर बोकेफोडे यांचा समाजाला प्रेरणादायी संदेश

**■ पिंपरी (दै. संध्या)**

वाढदिवसानिमित्त होणाऱ्या पार्ट्या आणि अनावश्यक खर्चाला फाटा देत उद्योजक सागर बोकेफोडे यांनी सामाजिक बांधिलकीचा अनोखा आदर्श घालून दिला. तत्त्वम सोशल फाउंडेशनच्या सामाजिक कार्यापासून प्रभावित होऊन त्यांनी आपला वाढदिवस कान्हे येथील किनारा वृद्धाश्रमातील आजी-आजोबांच्या सहवासात सेवाकार्य करत साजरा केला.

यावेळी आश्रमातील वृद्धांना थंडीपासून संरक्षणासाठी ब्लँकेट्स तसेच पौष्टिक व आवडीच्या अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. केवळ वस्तूवाटप न करता उपस्थित मान्यवर व कार्यकर्त्यांनी वृद्धांशी थेट संवाद साधत त्यांच्या सुख-दुःखाची आत्मीयतेने विचारपूस केली. वाढत्या वयात हक्काच्या माणसांची सोबत सुटलेल्या या निराधारांना 'कोणीतरी आपली काळजी घेणारे आहे' हा विश्वास या उपक्रमामुळे मिळाला.

एका बाजूला तरुणाईची सामाजिक जाणीव आणि दुसऱ्या बाजूला ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्यातील कृतज्ञतेचे भाव, असा दोन पिढ्यांना जोडणारा भावूक प्रसंग या वेळी पाहायला मिळाला. वाढदिवसावर अनाठायी खर्च करण्यापेक्षा या ज्येष्ठ माऊलींच्या चेहऱ्यावरील हसू आणि समाधान हाच माझ्यासाठी सर्वोत्तम आशीर्वाद असल्याचे मनोगत सागर बोकेफोडे यांनी या वेळी व्यक्त केले. तत्त्वम सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांच्या पाठीशी उभे राहण्याचा संकल्प कायम राहील, असा विश्वास या प्रसंगी व्यक्त करण्यात आला.या सेवाकार्याविळी तत्त्वम सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र ठिकेकर, सचिव वंदना चौहान, खजिनदार मनीषा थोरात-पिसाळ, सदस्य आयुष चौहान, संदीप पिसाळ, रवींद्र लंघे, कैलास कोकाटे यांच्यासह उद्योजक सागर बोकेफोडे यांचा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. झगमगाटाच्या काळात सामाजिक भान जपत साजरा झालेला हा वाढदिवस उपस्थितांची मने जिंकून गेला.

## गणेशोत्सवात देहूगावात 'पाणीबाणी'



**■ देहूगाव (दै. संध्या)**

ऐन गणेशोत्सवाच्या सणासुदीत तीर्थक्षेत्र देहूगावातील काही भागांवर तीन दिवसांपासून पाणीबाणी ओढवली आहे. विठ्ठलवाडी, बाजारआळी, देहू-आळंदी रोड, गाथा मंदिर परिसरासह काही भागांतील पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांचे मोठे हाल होत आहेत.

पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना टँकरचा आधार घ्यावा लागत असून, त्यासाठी हजारो रुपये खर्च करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी देहू नगरपंचायत प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ऐन सणासुदीच्या काळात तीन-तीन दिवस नागरिकांना पाणी मिळत नसेल तर, प्रशासन नेमके काय करते? असा सवाल जिल्हा परिषदेचे माजी सदस्य माऊली काळोखे यांनी उपस्थित केला. देहू नगरपंचायत हद्दीत वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून, त्याचा थेट परिणाम पाणीपुरवठ्यावर होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. बुधवारी कमी दाबाने व अपुरा पाणीपुरवठा करण्यात आला. त्यानंतर गुरुवारी साप्ताहिक सुट्टी आणि शुक्रवारी तांत्रिक बिघाड झाल्याने अनेक भागांतील पाणीपुरवठा ठप्प झाला. सलग तीन दिवस पाणी न आल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय झाली आहे. विशेष म्हणजे तीर्थक्षेत्र देहूत दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असताना पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने भाविकांनाही त्रास सहन करावा लागला.

तीर्थक्षेत्र देहूगावात दर्शनासाठी हजारो भाविक येतात. गेल्या तीन दिवसांपासून पाणी नसल्याने नागरिकांसह भाविकांचेही प्रचंड हाल झाले. पाणीपुरवठा सुरळीत करता येत नसेल तर, नगरसेवकांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी संत तुकाराम महाराजांचे वंशज नाना मोरे यांनी केली आहे.

विठ्ठलनगरमध्ये तीन दिवसांपासून पाणी नाही. सर्वसामान्य नागरिकांनी काय करायचे? प्रत्येकाला हजार रुपये खर्च करुन टँकर मागवणे शक्य नाही. त्यामुळे नागरिकांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होत आहेत, असे परिसरातील नागरिक राजेंद्र हगवणे यांनी सांगितले.

## पादचाऱ्यांची सुरक्षा वाऱ्यावर! २१६० किमी रस्त्यांपैकी केवळ ३६८ किमीवर पदपथ

**■ पिंपरी(दै. संध्या)**

श्रीमंत असा नावलौकीक असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात तब्बल २ हजार १६० किलोमीटर अंतराचे प्रशस्त रस्ते आहेत. मात्र, पादचाऱ्यांना सुरक्षितपणे चालण्यासाठी केवळ ३६८ किलोमीटर लांबीचे पदपथ आहेत. शहरात केवळ १७ टक्के मार्गावर पदपथ आहेत. उर्वरित१ हजार ७९२ किलोमीटर रस्त्यांना पदपथ नसल्याने पादचाऱ्यांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे दिसून येत आहे.

पिंपरी-चिंचवड शहर 181 चौरस किलोमीटर क्षेत्रफळात वसले आहे. शहरात मुख्य रस्ते हे प्रशस्त आहेत. त्यासाठी उड्डाण पुल, पुल, ग्रेडसेपरेटर, भुयारी मार्ग निर्माण करण्यात आले आहेत. अंतर्गत रस्तेही मोठ्या प्रमाणात निर्माण केले जात आहेत. समाविष्ट भागांत नव्याने रस्ते निर्माण केले जात असून, त्यासाठी महापालिका अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. असे असले तरी, शहरात केवळ 17 टक्के रस्त्यांवर पदपथ निर्माण करण्यात आले आहे. उर्वरित रस्त्यांना पदपथच नाहीत. त्यामुळे नागरिकांसह महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, विद्यार्थ्यांना रस्त्यावरून चालताना कसरत करावी लागते. जीव धोक्यात घालून रस्त्याच्या कडेने चालावे लागते. त्यात लहान-मोठे अपघात होत आहेत. स्मार्ट सिटीने वाटचाल करणाऱ्या शहरात सुरक्षित पादचारी मार्गाची मागणी केली होत आहे. मात्र, महापालिकेकडून केवळ रस्ते विकासाला प्राधान्य दिले जात असल्याचे चित्र आहे. शहरी रस्ते केवळ वाहनचालकांसाठी नसून, पादचारी, सायकलस्वार, ज्येष्ठ, अंध, अपंग, विद्यार्थी, विक्रेते असे 8 ते 10 घटकांसाठीही आहेत. राज्य शासनाच्या परिपत्रकानुसार पालिकेने शहरातील सर्व रस्त्यांची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार



रस्ते बनवितानाच सुरक्षित पदपथ बांधण्यास प्राधान्य दिले जात आहे. अपघात होणार नाही, अशा संरचनेचे व डिजाईनचे रस्ते विकसित करण्यात येत आहेत. पादचाऱ्यांनी उपलब्ध पदपथांचा वापर करणे आवश्यक असून, पदपथावर वाहने पार्क केली जाऊ नयेत, असे पालिकेच्या शहरी दवळवळण विभागाचे सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड यांनी सांगितले.

कासारवाडी येथील नाशिक फाटा चौकात पदपथच नाहीत. उपलब्ध असलेल्या पदपथावर वाहने, हातगाड्या, ट्रॅव्हल्सच्या बसेस, रिक्षा उभा असतात. त्यामुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागते. तसेच, रस्ता ओलांडण्यासाठी पादचाऱ्यांना, प्रवाशांना सुरक्षित मार्ग नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. अक्षरशः बँग व पिशव्या घेऊन त्यांना रस्ता पार करावा लागतो. वाहतूक पोलिसांकडून अतिक्रमण तसेच, वाहतुकीस अडथळा निर्माण करण्यावर नियमितपणे कारवाई होत नसल्याचे चित्र आहे. महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून स्मार्ट सिटी तसेच, अर्बन स्ट्रीट डिजाईनअंतर्गत आकर्षक पदपथ तयार केले आहेत. त्या पदपथांवर दुकानदार, व्यावसायिक, विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहेत. ते आपले साहित्य थेट पदपथावर मांडतात. थेय दुचाकी व मोटारकार पदपथावर पार्क केली जातात. अतिक्रमणामुळे पदपथ निरुपयोगी ठरत आहेत. त्यामुळे पादपथ असूनही नागरिकांना रस्त्यावर उतरावे लागते. अनेक भागात अपूर्ण व तुटलेले पदपथ असून, काही ठिकाणी चेंबरचे झाकणे गायब आहेत. अनेक ठिकाणी पदपथ अचानक संपत असल्याने सलग कनेक्टिव्ही नाही. वारंवार खोदकाम केल्याने खड्डे, तुटलेल्या पेव्हिंग ब्लॉक, उंच-सखल पृष्ठभाग, चिखल आदीचा सामना करावा लागतो. पदपथावर दिव्यांगांसाठी सुविधांचा अभाव सर्वत्र दिसून येतो. व्हीलचेअर व दृष्टिहीन नागरिकांसाठी रॅम्पची कमतरता आहे. महापालिकेच्या वतीने शहरातील 18 मीटरपेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांवर अर्बन स्ट्रीट डिजाईनअंतर्गत प्रशस्त पदपथ व सायकल ट्रॅक निर्माण केले जात आहेत.

# कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्यांसाठी जनशक्ती कामगार संघाचा मोर्चा

## नवीन ठेक्यात सर्व कामगारांना कायम ठेवण्याची मागणी; नगरपरिषदेसमोर सभा घेऊन निवेदन सादर

■ बारामती (दै. संध्या)



बारामती नगरपरिषदेमार्फत नवीन कंत्राटाची प्रक्रिया सुरू असताना कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी जनशक्ती कंत्राटी कामगार संघाच्या वतीने मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून बारामती नगरपरिषदेवर मोर्चा काढण्यात आला.मोर्चानंतर नगरपरिषदेसमोर सभा घेण्यात आली.त्यानंतर बारामती नगरपरिषद अधिकाऱ्यांना संघटनेच्या वतीने मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्यांबाबत महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा.ना.सुनेत्रावहिनी पवार तसेच बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना संघटनेच्या वतीने यापूर्वी निवेदन देण्यात आले होते. नवीन ठेक्यामध्ये सध्या बारामती नगरपरिषदेत कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना कायम ठेवण्यात यावे व कोणत्याही कामगाराला कमी करू नये,ही संघटनेची प्रमुख मागणी आहे. तसेच कामगारांना नियमानुसार किमान वेतन,पी.एफ,ESIS, बोनस आणि साप्ताहिक सुट्टी देण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली आहे. तत्कालीन ठेकेदारांनी कामगारांच्या पी.एफ व ESIS ची रक्कम नियमानुसार भरली आहे किंवा नाही,याची सखोल चौकशी करण्यात यावी.चौकशी करताना संबंधित कामगारांचे म्हणणे ऐकून त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात यावी. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित ठेकेदारांची सुरक्षा अनामत रक्कम परत देण्यात येऊ नये.तसेच दोष आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी संघटनेने केली आहे. बारामतीतील स्थानिक ठेकेदारांना ठेका मिळण्यासाठी आवश्यकतेनुसार नियम व अटी शिथिल करण्यात याव्यात.तसेच दर तीन महिन्यांनी कंत्राटी कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात यावी आणि कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून देण्यात यावे,अशी मागणीही करण्यात आली आहे. कामगार कामावर असताना वाहनाचा अपघात झाल्यास त्याचा खर्च कामगारांच्या वेतनातून कपात करू नये,तर संबंधित ठेकेदाराने तो खर्च करावा.प्रत्येक कामगाराला पेमेंट स्लिप देण्यात यावी तसेच वेतन दर महिन्याच्या ७ तारखेपर्यंत अदा करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. कंत्राटी कामगाराला कामावरून कमी करताना नियमानुसार नोटीस देण्यात यावी.कामाच्या कालावधीत कामगाराचा अपघात झाल्यास त्याचा वैद्यकीय खर्च संबंधित ठेकेदाराने करावा. तसेच उपचार व रजेच्या कालावधीतील वेतनाबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी,अशी मागणी संघटनेने केली आहे. मोर्चानंतर झालेल्या सभेत नगरसेवक आरती शेंडगे (गव्हाळे), सामाजिक कार्यकर्ते मुनीर तांबोळी,अक्षय खरात,भारतीय युवा पँथर संघटनेचे महाराष्ट्र संपर्कप्रमुख शुभम गायकवाड आणि पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मंगल जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.झोपडपट्टी सुरक्षा दलाच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. त्यानंतर सभेच्या ठिकाणी बारामती नगरपरिषद अधिकाऱ्यांना संघटनेच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. कामगारांच्या हक्कांशी संबंधित मागण्यांची तातडीने दखल घेऊन नवीन कंत्राट प्रक्रियेत कामगारांच्या हिताचे निर्णय घेण्यात यावेत,अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित

मोर्चाबाबत निवेदन देताना जनशक्ती कंत्राटी कामगार संघाचे संस्थापक अध्यक्ष गौरव रणधीर अहिवळे,बारामती शहर अध्यक्ष आकाश शिंदे,उपाध्यक्ष शंकर शिंदे, कार्याध्यक्ष निखिल सरोदे, सहकार्याध्यक्ष अनिकेत धालपे,सरचिटणीस सुरज वाडेकर, सहसंघटक स्वप्निल लोंढे,बारामती तालुकाध्यक्ष विशाल जगताप, तालुका कार्याध्यक्ष प्रेम खरात, बारामती शहर महिला अध्यक्ष संगीता खरात,महिला उपाध्यक्ष प्रतिभा वाघमारे,महिला कार्याध्यक्ष रुपाली वाडेकर,महिला संघटक अलका बगाडे,महिला सरचिटणीस अनिता पवार,महिला सहकार्याध्यक्ष सुजाता साबळे, महिला सहसंघटक सुमन अहिवळे, एमआयडीसी विभाग अध्यक्ष शहाजी बाळू कांबळे, उपाध्यक्षभारती साबळे,उपाध्यक्ष स्वाती गायकवाड,कार्याध्यक्ष सरिता सरतापे,सहकार्याध्यक्ष सुप्रिया खरात,संघटक रेश्मा सावंत, सरचिटणीस निलेश काकडे, संपर्कप्रमुख शितल भोसले,सदस्य नाना बगाडे,रितेश जाधव,विकास माने,विजय मस्के,बाप्पा तोरणे, अक्षय सरोदे तसेच भारतीय युवा पँथर संघटनेच्या सातारा जिल्हाध्यक्ष सुषमा पवार,सदस्य मंजुषा भंडारे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### चाकणला स्व. आ. सुरेशभाऊ गोरे विद्यालयात गणरायाची प्राणप्रतिष्ठापना

चाकण : दैनिक संध्या

येथील स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कूल, तसेच स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज मध्ये पारंपरिक पद्धतीने गणरायाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विकासभाऊ गोरे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, शिक्षक गणेश काळे, पल्लवी महानगरे, तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी धनश्री कांबळे, अलका घोडेकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. बुद्धीची व विद्येची देवता असलेल्या श्री गणरायाचे संस्थेत भक्तिमय वातावरणात आगमन करून प्राणप्रतिष्ठा व आरती करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी गणरायाची विविध अतिशय सुरेख चित्रे रेखाटून आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या सुंदर गणेशचित्रांचे संस्थेचे अध्यक्ष विकासभाऊ गोरे यांनी कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारे शिक्षक गणेश काळे यांनाही त्यांनी धन्यवाद दिले. चाकणला गणरायाच्या आगमनामुळे संपूर्ण शैक्षणिक संकुलात उत्साह, भक्ती आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. प्राचार्या प्रमिला गोरे यांनी आभार मानले.

### ‘अन्नसुरक्षा व निरोगी जीवन’ या संकल्पनेतून गणेशोत्सव साजरा

सासवड : दैनिक संध्या

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवड येथे इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी ‘अन्नसुरक्षा आणि निरोगी जीवन’ या अभिनव संकल्पनेवर आधारित गणेशोत्सव साजरा केला. विद्यार्थ्यांनी आकर्षक सजावट, माहितीपूर्ण फलक, विविध सादरीकरणे व जनजागृतीपर संदेशांच्या माध्यमातून अन्न भेसळ, अन्न स्वच्छता, अन्नाची गुणवत्ता आणि सुरक्षित अन्नपदार्थांची निवड याबाबत जनजागृती केली. पारंपरिक गणेशोत्सवाला सामाजिक संदेशाची जोड देत विद्यार्थ्यांनी ‘सुरक्षित अन्न, निरोगी जीवन’ हा महत्त्वपूर्ण संदेश दिला. या उपक्रमासाठी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजीत टकले व उपप्राचार्य सौ. सुषमा रासकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. तसेच ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख सौ. उज्वला जगताप मॅडम व सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. चित्रलेखा केसर यांचे मार्गदर्शन लाभले. वर्गशिक्षिका सौ. पूजा क्षीरसागर व सौ. शुभदा दुधाने यांनी विद्यार्थ्यांना तयारीपासून सादरीकरणापर्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. संस्कृती, सर्जनशीलता आणि सामाजिक जनजागृती यांचा सुंदर मिलाफ साधणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले. विद्यार्थ्यांसाठी हा गणेशोत्सव केवळ उत्सव न राहता आरोग्यदायी जीवनशैली आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश देणारा अर्थपूर्ण शैक्षणिक अनुभव ठरला. विद्यार्थ्यांच्या या नावीन्यपूर्ण आणि सर्जनशील उपक्रमाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक कौतुक केले व गणेशोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या.



### चाकणला गाजतोय खंडोबा बानुबाई सोहळा

चाकण : दैनिक संध्या

शताब्दी वर्षात पदार्पण केलेल्या येथील समस्त बालवीर मंडळाचा यंदाचा जिवंत देखावा खंडोबा बानुबाई विवाह सोहळा हा चाकण मध्ये गाजत आहे. चाकण येथील 'श्री समस्त बालवीर मंडळ' आयोजित शतक महोत्सवी वर्षा निमित्त 'श्रीं'च्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात करण्यात आली. हा विशेष सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. प्रमुख कार्यक्रम व मान्यवर 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना भरतशेठ एकनाथ कानपिळे व सौ. सुनीता भरतशेठ कानपिळे यांच्या शुभहस्ते करण्यात आली. 'श्रीं'ची समग्र पूजा माजी नगरसेवक श्री. विशाल कालिदास नायकवाडी व उपनगरअध्यक्ष सौ. जयश्रीताई विशाल नायकवाडी यांच्या हस्ते पूर्ण झाली. देखाव्याचे उद्‌घाटन किरणशेठ शंकरराव गायकवाड यांच्या शुभहस्ते झाले. शतक महोत्सवी वर्षाच्या या विशेष औचित्यावर आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते, असे आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते संजय वाडेकर यांनी सांगितले.

# कोंढवा-भिवरी-सासवड मार्गाचे चौपदरीकरण करा

### मुख्यमंत्र्यांकडे मागणी

■ नाझरे सुपे, ता. पुरंदर (दै. संध्या)



पुणे जिल्ह्यातील वाढती वाहतूक, पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि भविष्यातील औद्योगिक व व्यापारी विस्तार लक्षात घेता कोंढवा-भिवरी-सासवड या प्रमुख मार्गाचे चौपदरीकरण तातडीने करावे, अशी आग्रही मागणी भारतीय जनता पक्षाचे पुरंदर तालुका पश्चिम अध्यक्ष संदिप बबन कटके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या पुणे शहरातून सासवडकडे जाणारा हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा असून या मार्गावर वाहतुकीचा प्रचंड ताण आहे. दिवसेंदिवस दुचाकी, चारचाकी आणि मालवाहू वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. मात्र रस्ता अरुंद असल्याने रोजच वाहतूक कोंडी होत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. या मार्गावरून प्रवास करणारे हजारो नागरिक, शेतकरी, कामगार आणि विद्यार्थी यांना दररोज मनस्ताप सहन करावा लागत आहे.

पुरंदर येथे आंतरराष्ट्रीय विमानतळाचा प्रकल्प साकार होत असल्याने या रस्त्याचे महत्त्व अधिकच वाढले आहे. भविष्यात पुण्यातून विमानतळावर जाण्यासाठी कोंढवा-भिवरी-सासवड हा सर्वात जवळचा आणि सोयीचा मार्ग ठरणार आहे. विमानतळ सुरू झाल्यानंतर प्रवाशांची आणि वाहनांची संख्या कित्येक पटीने वाढणार आहे. तसेच विमानतळ परिसरात मोठ्या प्रमाणावर उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्र विकसित होणार असून त्यामुळे मालवाहतूकही मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता आतापासूनच या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम हाती घेणे आवश्यक आहे.

या रस्त्याचे चौपदरीकरण झाल्यास वाहतूक कोंडीची समस्या कायमची संपुष्टात येईल. नागरिकांना सुरक्षित, जलद आणि आरामदायी प्रवासाची सुविधा मिळेल.

त्याचबरोबर पुरंदर विमानतळाच्या विकासाला गती मिळून संपूर्ण तालुक्याच्या आर्थिक प्रगतीला मोठी चालना मिळणार आहे. त्यामुळे शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून तातडीने निधी उपलब्ध करून कामास मान्यता द्यावी, अशी मागणी कटके यांनी केली आहे.

## नारायणगाव आणि वारूळवाडी परिसरात गणेशोत्सवाचा मोठा उत्साह

■ नारायणगाव (दै. संध्या)



गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया... आणि 'वेलकम वेलकम गणराज वेलकम' अशा जल्लोषात नारायणगाव आणि वारूळवाडी परिसरात लाडक्या गणरायाचे अत्यंत भक्तीभावाने आणि उत्साहात स्वागत करण्यात आले. गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर दोन्ही गावांमधील घराघरांमध्ये तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये बाप्पाची मोठ्या थाटामाटात प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून परिसरात गणेशोत्सवाच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू होती. उत्सवाच्या पहिल्याच दिवशी सकाळपासूनच ढोल-ताशा,डफडे आणि पिपाण्यांच्या निनादाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. लहानांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वच स्तरांतील नागरिक पारंपारिक वेशभूषा करून मंत्रपुष्पांजलीच्या सुमधूर आवाजात बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना करताना दिसत होते. काही भाविकांनी गर्दी टाळण्यासाठी गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशीच रात्री मूर्ती घरी आणल्या होत्या. नारायणगाव व वारूळवाडी परिसरात सुमारे ३० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आणि जवळजवळ ३ हजार घरगुती गणपती बाप्पांची स्थापना करण्यात आली आहे. बाजारपेठेत गणेश मूर्ती विक्रेत्यांनी आकर्षक स्टॉल लावले होते. कलासागर आर्टचे गणेश मूर्ती विक्रेते संतोष पाटे आणि गणपती मूर्ती विक्रेते बुवा शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बाजारपेठेत ५०१ रुपयांपासून ते ३१ हजार रुपयांपर्यंतच्या आकर्षक गणेशमूर्ती विक्रीसाठी उपलब्ध होत्या. उत्सवाच्या काळात बाजारपेठेतही मोठी उलाढाल पाहायला मिळत आहे. सजावटीचे साहित्य आणि मिठाई खरेदीसाठी दुकानांमध्ये नागरिकांची प्रचंड गर्दी होत असल्याचे स्वीट मार्ट चालक अक्षय बराटे आणि विक्रेते विशाल दळवी यांनी नमूद केले. ढोल-ताशांच्या गजरात, मंत्रोच्चारात आणि पारंपरिक उत्साहात लहानग्यांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनीच बाप्पांचे स्वागत केले.

## नेपतवळण गावातील स्मशानभूमी कामात गौडबंगाल

- संबंधित प्रशासन झाले मालामाल
- स्मशानभूमी बांधकाम १५ लाख रुपयांच्या कामात मोठा अपहार
- परस्पर स्मशानभूमीच्या जागेत बदल व स्मशानभूमीचे केले निकृष्ट काम

■ बऱ्हाणपूर/नेपतवळण (दै. संध्या)



बारामती तालुक्यातील नेपतवळण गावात जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ अंतर्गत ग्रामपंचायतींना जनसुविधांसाठी विशेष अनुदान स्मशानभूमीच्या बांधकाम कामासाठी जिल्हा परिषद पुणे (ग्रामपंचायत विभाग) यांकडून १५ लक्ष रुपये मंजूर झाले होते.या कामात संबंधित उपअभियंता प्रशांत मिसाळ,शाखा अभियंता श्रीमती शिरसाठ एम.एस मॅडम, गटविकास अधिकारी किशोर माने,ठेकेदार विक्रम जामदार व गृप ग्रामपंचायत बऱ्हाणपूर-नेपतवळण यांच्यात संगनमत करुन स्मशानभूमी बांधकाम ज्या जागेमध्ये नेपतवळण येथील गट नंबर-२२९ मध्ये ५ आर क्षेत्रात मंजूर असून त्या जागेत न बांधता परस्पर दुसऱ्या जागेत १ किमी अंतरावर कऱ्हानदी पात्रात पाटबंधारे विभागाची परवानगी न घेता शासनाच्या निधीचा अपहार व निकृष्ट दर्जाचे स्मशानभूमीचे बांधकाम केले आहे.

त्याकामी नेपतवळण गावातील ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद पुणे यांस संबंधित ठेकेदाराचे बील अदा न करणेबाबत पत्रव्यवहार केला आहे.

ज्या भागात स्मशानभूमीचे बांधकाम करायचे आहे त्या ठिकाणी न करता नेपतवळण गावच्या दोन वस्त्यांच्या रहिवाशांचा प्रश्न स्मशानभूमी पासून वंचित ठेवून दुसऱ्याच जागी कऱ्हानदी पात्रात बांधल्यामुळे त्यांना त्याठिकाणी जाण्याची मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्याठिकाणी जाण्यास सरकारी रस्ता नाही तसेच पाटबंधारे विभागाची परवानगी न घेता त्यांच्या हद्दीत कऱ्हानदी पात्रात बांधली आहे.

नदीला पाणी आल्यास नदीपात्रातून स्मशानभूमी वाहून गेल्यास जबाबदार कोण व १५ लक्ष रुपयांच्या निधीचा गैरवापर केला आहे त्यामुळे संबंधित प्रशासन अधिकारी, ठेकेदार यांच्यावर कठोर कारवाई होणार का व ठेकेदारास काळ्या यादीत टाकणार का? तसेच स्मशानभूमीचे निकृष्ट दर्जाचे काम मुदत संपल्यानंतरही काम पूर्ण न झालेबाबत उच्चस्तरीय चौकशी होणार का? असे अनेक प्रश्न गावकऱ्यांच्या मनात निर्माण झाले आहेत,असे गावकऱ्यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

### इंस्टाग्रामवरील फेक अकाउंटद्वारे विद्यार्थीनीस अश्लील मेसेज करून त्रास देणाऱ्या विधिसंघर्षग्रस्त बालकाचा

# माळेगाव पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपासातून लावला शोध

■ माळेगाव (दै. संध्या)




माळेगाव पोलीस ठाणे हद्दीतील एका महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीस अज्ञात व्यक्तीकडून इंस्टाग्रामवर फेक अकाउंट तयार करून वारंवार अश्लील मेसेज पाठवून त्रास दिला जात असल्याची घटना निदर्शनास आली होती.संबंधित इंस्टाग्राम अकाउंट विद्यार्थीनीने ब्लॉक केल्यानंतर आरोपीने पुन्हा नवीन फेक अकाउंट तयार करून त्याद्वारे अश्लील मेसेज पाठवून त्रास देण्यास सुरुवात केली. याबाबत संबंधित विद्यार्थीनीने शक्ती अभियानांतर्गत दिनांक २१/०८/२०२६ रोजी माळेगाव पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीची माळेगाव पोलिसांनी तात्काळ दखल घेऊन प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करून अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी तांत्रिक तपास सुरू केला. माळेगाव पोलीस ठाण्याच्या सायबर टीमने अत्यंत कौशल्यपूर्ण व तांत्रिक पद्धतीने तपास करून उपलब्ध डिजिटल माहिती,सोशल मीडिया अकाउंट्स व तांत्रिक बाबींच्या आधारे आरोपीचा माग काढला.सदर गुन्हा हा विधिसंघर्षग्रस्त बालकाकडून झाल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानंतर विधिसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेऊन गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेला मोबाईल फोन जप्त करण्यात आला आहे. तसेच संबंधित विधिसंघर्षग्रस्त बालकाचे आवश्यकतेनुसार समुपदेशन करण्यात आले असून,त्यासंदर्भात कायद्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

या कारवाईमुळे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा गैरवापर करून मुली व महिलांना त्रास देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध माळेगाव पोलिसांची कठोर व तात्काळ कारवाई करण्याची भूमिका स्पष्ट झाली आहे. मुली व महिलांनी सोशल मीडियावर अशा प्रकारचा त्रास होत असल्यास घाबरून न जाता तात्काळ पालक,शिक्षक किंवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. तसेच अश्लील मेसेज, फेक अकाउंट,धमकी किंवा ऑनलाइन छळासंदर्भातील स्क्रीनशॉट,अकाउंटची लिंक/यूज़रनेम व इतर डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवावेत.

सदरची कामगिरी मा.संदीपसिह गिल पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण,मा.गणेश बिरादार अपर पोलीस अधीक्षक बारामती विभाग, मा.चैतन्य कदम उपविभागीय पोलीस अधिकारी बारामती उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीशैल चिवडशेट्टी पोलीस निरीक्षक बारामती शहर,सहा. पोलीस निरीक्षक कुलदीप संकपाळ माळेगाव पोलीस स्टेशन, पोलीस अंमलदार ज्ञानदेव सानप, विकास राखुंडे यांनी केली आहे.




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे

## गणेशोत्सव जागतिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न – मंत्री ॲड. आशिष शेलार

मुंबई : महाराष्ट्राच्या सार्वजनिक गणेशोत्सवाची धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरा जागतिक व्यासपीठावर अधोरेखित करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून केंद्र सरकारच्या सहकार्याने गणेशोत्सवाचा युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत समावेश व्हावा, यासाठीही प्रयत्न सुरु असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. वांद्रे पश्चिम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, रेक्लेमेशन येथे 'Bappa.org' आणि महाराष्ट्र गणेश उत्सव राज्य महोत्सवाच्या अधिकृत लोगोचे थाटामाटात अनावरण करण्यात आले. यावेळी अभिनेते रितेश देशमुख, नेहा पेंडसे, नित्यश्री ज्ञानलक्ष्मी, श्रीपाद आष्टीकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी मंत्री ॲड. शेलार म्हणाले, राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून गौरविले आहे. आस्था, श्रद्धा, निष्ठा आणि परंपरेची सांगड घालणारा हा उत्सव धार्मिक व अध्यात्मिक असून सामाजिक आणि राष्ट्रीय विचारांचेही प्रभावी माध्यम आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून रुजविलेली ही लोकचळवळ घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सवांच्या माध्यमातून आजही जतन केली जात असल्याचे ॲड. शेलार यांनी नमूद केले. 'Bappa.org' या डिजिटल मंचावर देश-विदेशातील घरगुती आणि सार्वजनिक गणपतींची माहिती एकत्रित केली जाणार आहे. त्याद्वारे जगभरातील भाविकांना महाराष्ट्राच्या या समृद्ध उत्सवपरंपरेत सहभागी करून घेता येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या विद्यार्थ्यांनी साकारलेला १२ फुटी भव्य मोदकाचा फिरता चित्ररथ सादर करण्यात आला. गणरायाची प्रतिमा, लोकमान्य टिळक आणि गणेशोत्सवाच्या परंपरेशी निगडित कलात्मक बाबींचा समावेश असलेला हा चित्ररथ वर्षभर राज्यभर फिरविण्यात येणार असून, त्यातून राज्य महोत्सवाची व्याप्ती, लोककला आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन, संवर्धन व प्रसार केला जाणार असल्याचे ॲड. शेलार यांनी सांगितले.

## भरती परीक्षा पद्धतीच्या सुधारणांसाठी उच्चस्तरीय समिती १६ सप्टेंबरला नागपुरात

नागपूर : भरती परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी गठित करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या नागपूर येथील संवाद कार्यक्रमाच्या अनुषंगाने समितीचे अध्यक्ष व सदस्य बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, सदर पोलीस स्टेशनच्या मागे, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे उपस्थित राहणार आहेत. राज्यातील स्पर्धा परीक्षार्थींच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या प्रक्रियेत नागपूर महसूल विभागातील सर्व संबंधित घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या सूचना व अभिप्राय समितीसमोर सादर करावेत, असे आवाहन विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी केले. विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी आज विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात याबाबत आढावा बैठक घेतली. त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अपर आयुक्त प्रदीप कुलकर्णी, जिल्हा शल्यचिकित्सक निवृत्ती राठोड तसेच माहिती व जनसंपर्क कार्यालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी महानगरपालिका तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीच्या माध्यमातून राज्यातील प्रत्येक महसूल विभागातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी, नागरिक आणि अन्य संबंधित घटकांकडून परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी सूचना व अभिप्राय मागविण्यात आले आहेत. या अनुषंगाने समितीचे अध्यक्ष व सदस्य बुधवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे संवाद कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. त्यापूर्वी नागपूर विभागातील संबंधित घटकांकडून सूचना व अभिप्राय संकलित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव काळाची गरज

***गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे कार्य केले. महाराष्ट्र शासनाने १४ ऑगस्ट २०२५ रोजी गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून घोषीत केल्यामुळे या उत्सवाचा उत्साह द्विगुणीत झाला आहे. परंतू हा उत्सव साजरा करताना नागरिकांची सुरक्षितता, कायद्याचे पालन, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक आहे. आपल्या आनंदामुळे नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी भक्तिभाव कायम ठेवून शिस्तबद्ध रीतीने आणि सामाजिक भान जपून पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणे काळाची गरज आहे.. !***

राज्य महोत्सवातून पर्यावरण पूरक गणेशोत्सवाचा संदेश- राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केल्यानंतर यंदाच्या वर्षी हा उत्सव अधिक व्यापक, नियोजनबद्ध आणि लोकसहभागातून साजरा होण्यासाठी सर्व शासकीय विभाग प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्राची समृद्ध लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वैभव राज्याच्या सीमेपलीकडे पोहोचवण्यासाठी राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने 'लोककलेतील श्री गणेश' आणि 'महा गणेशोत्सव – महाराष्ट्राचा राज्य उत्सव' अंतर्गत देशातील विविध शहरांमध्ये विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. चेन्नई, सिल्वासा, कोलकाता आणि हैदराबाद मध्ये हे कार्यक्रम होणार आहेत.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने राज्यातील विविध कला, संस्कृती आणि लोकपरंपरांना चालना देणारे कार्यक्रम, शाडूच्या मूर्ती तयार करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन, 'इको-फ्रेंडली गणेश मूर्ती रंगरंगोटी महोत्सव, हातकागद कला संवर्धन, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम, हस्तकला प्रदर्शन, सामाजिक जनजागृती आणि विशेष उपक्रम राबवण्यात येत आहेत.

भव्य महा गणेशमूर्ती कार्यशाळा – प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' मधून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. हा संदेश व्यापक स्वरुपात पोहोचविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे नवी मुंबईत 'पर्यावरणपूरक महा गणेशमूर्ती कार्यशाळा' घेण्यात आली. 10 हजारांहून अधिक शालेय विद्यार्थी आणि नागरिकांनी एकाच वेळी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार केल्या.

मातीच्या मूर्तींना प्राधान्य- पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी राज्यभर व्यापक जनजागृतीवर भर देण्यात येत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शाडू माती किंवा नैसर्गिक मातीच्या गणेशमूर्तींना नागरिकांनी प्राधान्य देणे आवश्यक आहे. मूर्ती विसर्जनासोबत निर्माल्य संकलन, कचरा व्यवस्थापन आणि मंडप परिसराची स्वच्छतेकडेही गांभीर्याने पाहावे लागेल. जलस्रोतांचे संवर्धन – नदी, तलाव आणि अन्य जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाच्या वतीने मूर्ती संकलन व 'मूर्तीदान' उपक्रम राज्यभर राबवण्यात येतो. या उपक्रमाला नागरिकांनी आणि गणेशोत्सव मंडळांनी सहकार्य करायला हवे. घरगुती मूर्तींचे विसर्जन घरच्या घरी किंवा कृत्रिम तलाव, कुंड अशा पर्यायी व्यवस्थेत करणे पर्यावरणाच्या दृष्टीने उपयुक्त आहे. भक्तिभाव कायम ठेवून जलस्रोतांचे संरक्षण करण्याचा संदेश या माध्यमातून देता येईल.

डीजेमुक्त उत्सव साजरा करुन संस्कृतीचा गजर करुया- यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध भागांत डीजे आणि लेझरमुक्त उत्सवासाठी प्रशासनाबरोबरच नागरिकांकडून सकारात्मक भूमिका घेतली जात आहे. मर्यादेपेक्षा अधिक तीव्रतेच्या आवाजामुळे, लहान बालके, गरोदर माता, ज्येष्ठ नागरिक आणि हृदयविकाराच्या रुग्णांना धोका पोहचल्याची अनेक उदाहरणे आहेत. आपल्या आनंदामुळे नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी ध्वनी मर्यादेचे पालन करणे गरजेचे आहे. पारंपरिक ढोल-ताशा, लेझीम, झांज पथक, पोवाडे, शिवकालीन कला, लोकनृत्य आणि विविध लोककलांच्या सादरीकरणावर भर दिल्यास लोककला जपल्या जातील. तसेच स्थानिक लोककलाकारांना रोजगाराची संधी मिळवून देण्याचे सत्कार्य घडेल. यामुळे 'तीव्र आवाज टाळूया.. संस्कृतीचा गजर करुया' ही गणेशोत्सवाला ओळख देता येईल.

लेझरमुक्त गणेशोत्सव – अतितीव्र लेझरच्या प्रकाशामुळे अनेकांच्या डोळ्यांना इजा पोहचली आहे, तर काहींना डोळे गमवावे लागले आहेत. त्यामुळे आकर्षक रोषणाई करताना नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करणे अत्यावश्यक आहे. लेझरचा वापर टाळून सुरक्षित प्रकाशयोजनेला प्राधान्य द्यावे. यंदा डीजेसोबत लेझर लाईटच्या वापराबाबतही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. उत्सवातील आकर्षण वाढवताना नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही, याची दक्षता घेणे प्रत्येक मंडळाची जबाबदारी आहे.

गणेशोत्सवातून सामाजिक संदेशाची प्रभावी मांडणी – गणेशोत्सव मंडळे ही समाजप्रबोधनाची प्रभावी माध्यमे आहेत. शासकीय योजनांची माहिती, रक्तदान, आरोग्य तपासणी, स्वच्छता, वृक्षारोपण, महिला व बालसुरक्षा, व्यसनमुक्ती




आणि वाहतूक शिस्त यांसारख्या विषयांवर आधारित संदेश जास्तीत जास्त मंडळांनी देखाव्यांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहचवावा. 'माझा गणपती – माझी सामाजिक जबाबदारी' हा विचार प्रत्येक मंडळाकडून पोहोचवता येईल.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची लोकचळवळ – राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नियोजन आणि जनजागृतीला चालना देण्यात येत आहे. 'एक गाव, एक गणपती' सारख्या विधायक संकल्पनांसोबत घरगुती गणेशमूर्तींसाठी माती, धातू, संगमरवर किंवा अन्य पर्यायी मूर्तींचा विचार, कृत्रिम विसर्जन स्थळांचा वापर, मूर्ती व निर्माल्य संकलन आणि योग्य व्यवस्थापन याबाबत गावपातळीवर प्रबोधन करण्यात येत आहे. आशा, अंगणवाडी सेविका, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामपंचायत यांचा लोकसहभाग या उपक्रमाला व्यापक स्वरुप देत आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची प्रभावी तयारी – कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत साधारणपणे सन 2015 पासून पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन यंदाही उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील कुटुंबे आणि गणेशोत्सव मंडळांनी मूर्तीदान, निर्माल्य संकलन आणि जलप्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकानिहाय संपर्क अधिकारी नियुक्त करून गटविकास अधिकाऱ्यांच्या समन्वयाने संनियंत्रण व मार्गदर्शन करण्यात येत आहे.सन २०२५ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात २ लाख ९१ हजार ३१९ घरगुती तर २ हजार ४१० सार्वजनिक गणेशमुर्ती अशा एकूण २ लाख ९३ हजार ७२९ गणेशमूर्तींचे संकलन करण्यात आले. यासोबतच ३८५ घंटागाड्या आणि १ हजार ३५२ ट्रॉलीद्वारे निर्माल्य संकलन करण्यात आले आहे. यंदाही पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी कोल्हापूरकर सज्ज आहेत. युवकांनी उत्सवासोबत विष्याचाही विचार करावा – उत्सवादरम्यान डीजे नियमांचे उल्लघंन, वादविवाद, मारामारी, रस्त्यावरील बेशिस्त वर्तन, वाहतूक नियमांचे उल्लंघन, सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन आणि हुल्लडबाजी, महिलांची छेडछेड, सोशल मिडीयावरील आक्षेपार्ह पोस्ट अशा गैरप्रकारांमुळे गुन्हे दाखल होऊ शकतात. अशा गुन्ह्यांमध्ये अडकल्यास तरुणांच्या भविष्यावर परिणाम होऊ शकतो. शैक्षणिक अभ्यासक्रमांचे प्रवेश, परदेशी शिक्षण, शासकीय नोकरी किंवा इतर संधींसाठी आवश्यक असलेल्या चारित्र्य पडताळणीच्या प्रक्रियेत या बाबींचा विचार होऊ शकतो. त्यामुळे युवकांनी उत्साहाच्या भरात कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. 'एक दिवसाचा उत्साह, आयुष्यभराची अडचण होऊ नये, यासाठी विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.

प्रशासनाला सहकार्य – वाहतूक व्यवस्था, मिरवणुकीचे मार्ग, वेळेचे नियोजन, ध्वनीमर्यादा, अग्निसुरक्षा आणि गर्दीच्या व्यवस्थापनाबाबत प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे प्रत्येक मंडळाची जबाबदारी आहे. महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी स्वयंसेवकांची व्यवस्था, मदत कक्ष आणि आपत्कालीन संपर्क यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. प्रशासन आणि गणेशोत्सव मंडळांमधील समन्वयातून उत्सव अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि आनंददायी होईल.

उत्सव काळात स्वच्छतेला प्राधान्य – गणेश मंडपाचा परिसर, मिरवणुकीचे मार्ग आणि विसर्जनस्थळांवर स्वच्छता राखणे ही गणेश मंडळांची आणि यामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. उत्सवादरम्यानचे निर्माल्य, प्लॅस्टिकच्या पिशव्या, बाटल्या आणि अन्य कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावून स्वच्छतेचा जागर करणे आवश्यक आहे. बाप्पांच्या आगमनावेळी आणि विसर्जनावेळीही परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प प्रत्येकाने जोपासायला हवा.महाराष्ट्रासाठी आदर्श गणेशोत्सव घडवूया- लोकसहभागातून साजरा होणाऱ्या महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाला मोठी सांस्कृतिक परंपरा आहे. या उत्सवाला सामाजिक परिवर्तनाचा विचार लाभला आहे. या परंपरेला पर्यावरण संवर्धन तसेच नागरिकांची सुरक्षितता, सामाजिक बांधिलकीची जोड देण्याची गरज आहे. शासनाच्या वतीने लोककलांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, मातीच्या गणेश मूर्ती कार्यशाळा, उत्कृष्ट गणेश मंडळ स्पर्धा, सजावट स्पर्धा व अन्य उपक्रमांच्या माध्यमांतून पर्यावरण पूरक गणेशोत्सवावर भर देण्यात येत आहे. तसेच प्रदूषणमुक्त परिसर, स्वच्छता, सामाजिक कार्य आणि विधायक उपक्रमांना महत्त्व देण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धनासोबतच पारंपरिक कलांचे जतन, स्थानिक कलांना प्रोत्साहन आणि ग्रामीण भागातील कारागिरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत.

## नवी मुंबईत जेम्स अँड ज्वेलरी पार्क : केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह

■ मुंबई (दै. संध्या)




प्रयोगशाळेत विकसित होणाऱ्या हिऱ्यांच्या (लॅबग्रोन डायमंड) निर्मितीसाठी आवश्यक यंत्रसामग्रीपासून दागिन्यांचे उत्पादन, ब्रँडिंग, शोरूम आणि जागतिक विक्री व्यवस्थेपर्यंतची संपूर्ण मूल्यसाखळी भारतात उभारावी. या उदयोन्मुख क्षेत्रात भारतीय उद्योगाने जागतिक नेतृत्व प्रस्थापित करावे, असे आवाहन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी केले.

भारतातील रत्न व आभूषण उद्योगातील उत्कृष्टता, नेतृत्व आणि उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करणारा ५२ वा 'इंडिया जेम्स अँड ज्वेलरी अवॉर्ड्स' सोहळा मुंबईत आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात केंद्रीय मंत्री अमित शाह प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, पणन मंत्री जयकुमार रावल, खासदार गोविंद ढोलकिया, आमदार अमित साटम आणि कौन्सिलचे अध्यक्ष किरीट भन्साळी यांची प्रमुख उपस्थिती होती. यांच्यासह रत्न व आभूषण क्षेत्रातील उद्योजक, निर्यातदार, उत्पादक, बँकर्स, महिला उद्योजक आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री शाह म्हणाले की, भारताकडे पायाभूत सुविधा, ऊर्जा, भांडवल आणि उद्यमशील व्यापारी वर्गाचे सामर्थ्य आहे. लॅबग्रोन डायमंडची जागतिक बाजारपेठ आगामी काळात मोठ्या प्रमाणात विस्तारण्याची शक्यता आहे. त्यामुळे या क्षेत्रातील संधी ओळखून भारतीय उद्योगाने केवळ कामाची गतीच नव्हे, तर व्यवसायाची व्याप्तीही वाढवावी. भारतीय कंपन्यांनी जागतिक ब्रँड निर्माण करून प्रमुख शहरांमध्ये स्वतःची विक्री केंद्रे उभारावीत. यासाठी केंद्र सरकार आवश्यक ते सर्व सहकार्य करेल.

रत्न व आभूषण उद्योगासाठी नवी मुंबईत मोठी जागा आणि आवश्यक एफएसआय उपलब्ध करून देण्याची भूमिका मांडली आहे. हा उद्योग महाराष्ट्राबाहेर जाऊ नये, यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी मदत करण्यास कटिबद्ध असल्याचेही केंद्रीय मंत्री शाह यांनी सांगितले. भारताची रत्ने आणि आभूषणे ही हजारो वर्षांपासून जगभरातील ओळख आहे. सुमारे सहा हजार वर्षांपूर्वीपासून भारतातून रत्ने व आभूषणांचा व्यापार होत असल्याचे नमूद करून केंद्रीय मंत्री शाह म्हणाले की, मध्ययुगीन काळात राजाश्रयामुळे जडजवाहीर आणि आभूषण कलेला नवी उंची मिळाली. कुंदन, मीनाकारी यांसारख्या कलांचा विकास झाला. जयपूरची ओळख आजही रंगीत रत्नांची जागतिक राजधानी म्हणून आहे.

जगभरात पैलू पाडल्या जाणाऱ्या प्रत्येक दहा हिऱ्यांपैकी नऊ हिऱ्यांवर सुरतमध्ये प्रक्रिया होते. सुरतच्या हिरे उद्योगाने लाखो नागरिकांना रोजगार आणि आत्मनिर्भरता दिली असून, देशाच्या अर्थव्यवस्थेत व निर्यातीत मोठे योगदान दिले आहे. मुंबईनेही रत्न व आभूषण व्यापाराला निर्यातीची महत्त्वाची धुरा बनविले आहे. भारत डायमंड बोर्स हे भारतीय रत्न व आभूषण उद्योगाच्या जागतिक सामर्थ्याचे प्रतीक ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

वर्ष २०२५ मध्ये भारताची रत्न व आभूषण निर्यात २ लाख ४४ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. देशाच्या एकूण व्यापारी माल निर्यातीत या क्षेत्राचा वाटा ६.३ टक्के आहे. या उद्योगातून सुमारे ७५ लाख नागरिकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळत आहे. अमेरिका, मध्यपूर्व, हाँगकाँग आणि युरोपसाठी भारत हा आभूषणांचा महत्त्वाचा पुरवठादार ठरला आहे.

भारत जगातील ९० टक्क्यांहून अधिक कटिंग आणि पॉलिशिंग केलेल्या हिऱ्यांवर प्रक्रिया करतो. हे भारतीय उद्योजकांच्या साहसाचे आणि कौशल्याचे उत्तम उदाहरण आहे. युरोपियन युनियन, संयुक्त अरब अमिराती, ऑस्ट्रेलिया, ओमान आणि युनायटेड किंगडमसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारांचा उपयोग करून उद्योगाने नव्या बाजारपेठा आणि व्यावसायिक संधी शोधाव्यात, असेही शाह यांनी सांगितले.

## महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेस प्रतिसाद

■ मुंबई(दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६' साठी महाराष्ट्रभरातून ४३२ मंडळांनी अर्ज सादर केले आहेत. यामध्ये ठाणे जिल्ह्यातून सर्वाधिक ५२ अर्ज प्राप्त झाले आहेत. या स्पर्धेचा विस्तार मागील वर्षापासून तालुकास्तरापर्यंत करण्यात आला आहे.

यावर्षीपासून प्रथमच ही स्पर्धा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही विस्तारित करण्यात आली आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २५ सप्टेंबर आहे. अर्ज सादर करताना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मंडळांनी गेल्या वर्षभरात आयोजित केलेल्या गणेशोत्सव तसेच संबंधित सांस्कृतिक उपक्रमांची आणि यावर्षीच्या गणेशोत्सवाची छायाचित्रे जिओटॅगसह सादर करावयाची आहेत. आतापर्यंत राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी देशभरातील विविध शहरांतून अर्ज प्राप्त झाले आहेत. तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी जपान, श्रीलंका, जर्मनी, नायजेरिया, सिंगापूर आदी देशांतून अर्ज प्राप्त झाले आहेत. या स्पर्धेचा जागतिक विस्तार राज्य महोत्सवाला 'ग्लोबल' ओळख मिळवून देणारा ठरत आहे.

सार्वजनिक गणेशोत्सवाचे पारंपरिक आणि सांस्कृतिक महत्त्व ओळखून शासनाकडून गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित करण्यात आले आहे. मागील वर्षी या स्पर्धेच्या तसेच संबंधित अन्य उपक्रमांच्या आयोजनात व्यापक बदल करण्यात आले असून, वर्षागणिक मंडळे आणि नोंदणीकृत संस्थांचा या स्पर्धेतील सहभाग वाढत आहे.स्पर्धेचे परीक्षण अत्यंत पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार आहे. सहभागी मंडळांना तालुकास्तरीय आणि जिल्हास्तरीय परीक्षण समित्या प्रत्यक्ष भेट देणार आहेत. भेटीदरम्यान सहभागी मंडळांची सर्व कागदपत्रे, वर्षभरात राबविलेले उपक्रम, त्यांचे अहवाल, फोटो व व्हिडिओ, तसेच सांस्कृतिक स्पर्धा, संस्कृती आणि सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन विषयक उपक्रम, भाविकांसाठी केलेल्या सोयी-सुविधा, विविध स्पर्धा, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी राबविलेले कायमस्वरूपी तसेच उत्सवकाळातील उपक्रम, पर्यावरणपूरक मूर्ती व सजावट, प्रदूषणमुक्त वातावरण आदी विविध बाबींच्या आधारे परीक्षण करण्यात येणार आहे.

हे परीक्षण ऑनलाइन स्वरूपात करण्यात येणार असून, परीक्षकांना जिओटॅग केलेल्या छायाचित्रांद्वारे आपला निकाल सादर करावा लागणार आहे. यामुळे निकालात पारदर्शकता निर्माण होऊन स्पर्धेचे नियमन आणि नियंत्रण अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. तालुकास्तरीय प्रथम विजेत्याला २५ हजार रुपयांचे, तर जिल्हास्तरीय प्रथम, द्वितीय आणि तृतीय विजेत्यांना अनुक्रमे ५० हजार, ४० हजार आणि ३० हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत.

तसेच राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ७.५ लाख, ५ लाख आणि २.५ लाख रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



## गणेश उत्सवासाठी जेजुरी नगरपरिषद सज्ज

**जेजुरी : दैनिक संध्या**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत श्री गणेश उत्सव अतिशय जल्लोषात सुरू झाला आहे. या उत्सवात व विसर्जन मिरवणुकीसाठी जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी श्री गणेश उत्सवाच्या निमित्ताने जेजुरी शहरातील रस्त्यावर असणारे खड्डे बुजविण्यात आले असून श्री गणेश विसर्जनासाठी ऐतिहासिक होळकर तलाव परिसर व चिल्लाळ विहिरीजवळ कृत्रिम हौद, निर्माल्य टाकण्यासाठी कचरा कलश, तसेच होळकर तलावात बोट व जीवरक्षक दल उपलब्ध करण्यात आली आहे. असे सांगितले. तसेच जेजुरी हद्दीत नसलेल्या नाझरे जलाशयात मोठ्या संख्येने श्री गणेशाचे विसर्जन केले जाते. याठिकाणी नागरिकांना मदतीसाठी एक पथक तैनात करण्यात आले असल्याचे जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी सांगितले.



## आदिवासी शिक्षक संघटना व बिरसा ब्रिगेडने घेतली मंत्री नरहरी झिरवाळांची भेट

**जुन्नर : दैनिक संध्या**

महाराष्ट्र राज्य आदिवासी शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व बिरसा ब्रिगेड च्या कार्यकर्त्यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची नाशिक येथील निवासस्थानी भेट घेऊन शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी संघटनेच्या वतीने मागण्यांचे निवेदन मंत्र्यांना देण्यात आले. अन्नसुरक्षा मानके प्राधिकरणाचा परवाना मुख्याध्यापकांना बंधनकारक करू नये, प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांमध्ये पेसा टॅब द्यावा, आदिवासी भागातील कर्मचाऱ्यांचा प्रोत्साहन भत्ता ४०० वरून १,५०० रुपये करावा, आदिवासी भागासाठी स्वतंत्र शैक्षणिक पुरस्कार सुरू करावेत, संचमान्यतेचे निकष शिथिल करावेत, सेवेत कार्यरत शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षेची अट रद्द करावी, अशा मागण्या करण्यात आल्या. १ पेसा क्षेत्रातील १७ संवर्गाची कंत्राटी पदे नियमित करावीत, आदिवासी भागातील १२ हजार ५०० पदे तातडीने भरावीत आणि केंद्रप्रमुख भरती संवर्गनिहाय आरक्षणानुसार करावी,तसेच केंद्रीय विद्यालयात शाळा सोडल्याच्या दाखल्यावर फक्त अशी नोंद असते तिथे अनुसूचित जमात नोंद किंवा अनुसूचित जमातीचा क्रमांक टाकावा, अशी मागणीही केली. शिक्षकांच्या मागण्या समजून घेत मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शालेय शिक्षण मंत्र्यांसोबत मंत्रालयात संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची लवकरच बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले. तसेच बिरसा ब्रिगेडच्या ही काही मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले तर जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागातील रस्त्याच्या संदर्भात मागण्यासंदर्भात चर्चा केली तर त्यांच्या विशेष प्रयत्नातून जुन्नर आंबेगाव आदिवासी भागाला जोडणारा रस्ता लवकर पूर्ण होण्यासाठी बिरसा ब्रिगेड कडून निवेदन देण्यात आले पुणे जिल्हाधिकारी यांना ही या मागणी संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडून शिफारस करण्यात आली.यावेळी संघटनेचे राज्य अध्यक्ष निवृत्ती तळपाडे, यांच्यासह सरचिटणीस मोतीराम पवार, राज्य नेते रामचंद्र शिंगाडे, राज्य कार्याध्यक्ष मोहन उंडे, पुणे विभागीय अध्यक्ष बाळासाहेब बांबळे, पुणे जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानदेव दाभाडे, तर बिरसा ब्रिगेड चे सहयाद्री अध्यक्ष नवनाथ लहांगे नाशिक अध्यक्ष सर्जेराव भारमळ बिरसा ब्रिगेड पुणे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी मडके गणेश उंडे आदिवासी विचार मंच कार्यकर्ते दत्ता जाधव उपस्थित होते.

## श्री गणेशाचे उत्साहात आगमन; मुलींच्या सुरेल भजनाने मिरवणुकीत रंगत



**कवठे येमाई : दैनिक संध्या**

गणपती बाप्पामोरया, मंगलमूर्ती मोरया या गणरायाच्या जयघोषात, ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे श्री गणेशाचे उत्साहात आगमन झाले. गावातील पहिल्या मानाच्या श्री गुरुदेवदत्त ग्रामविकास प्रतिष्ठानच्या गणपतीची शेकडो कार्यकर्ते व भाविकांच्या उपस्थितीत विधीवत पूजा करून रात्री ७.५० वाजता प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी आळंदी येथील सुदाम हिंगे यांच्या राजमाता मुलींच्या वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थिनींनी सादर केलेल्या सुरेल, स्वरबद्ध भजनांनी व गवळणींनी उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थिनींच्या भक्तिमय सादरीकरणाने गणेश आगमन मिरवणुकीत विशेष रंगत निर्माण झाली.श्री गणेश आगमनानिमित्त डीजे विरहित व शांततामय मिरवणूक काढत सामाजिक सलोखा व शांततेचा संदेश देण्यात आला. प्रतिष्ठापनेनंतर उपस्थित भाविकांसाठी मासवडीच्या पारंपरिक भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यंदाच्या गणेशोत्सवात पुढील बारा दिवस विविध धार्मिक, सामाजिक, समाजोपयोगी व करमणुकीच्या कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. मंडपाची आकर्षक सजावट व नेत्रदीपक रोषणाईने परिसर उजळून निघाला असून, आमदाबाद येथील राजू जाधव यांच्या सुंदर मंडप व्यवस्थेने गणेशोत्सवाच्या उत्साहात आणखी भर पडली आहे. गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी अक्षय भंडारी,अथर्व काळे,सागर जाधव, तेजस काळे,चिराग रावल,संकेत चव्हाण, रोहित जगदाळे,शुभम कुंभार अतिकूर अन्सारी, ओंकार बांगर, मयूर रेणके, विकास जाधव यांच्यासह मंडळातील कार्यकर्ते अथक परिश्रम घेत आहेत. भक्ती, संस्कृती, सामाजिक बांधिलकी आणि उत्साह यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या गणेशोत्सवामुळे कवठे येमाई गावात नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

# उरुळी कांचनमध्ये गणरायाचे जल्लोषात आगमन

### केरळचे पारंपरिक चेंडा वाद्य, ढोल-ताशांचा गजर अन् २५ डीजेंच्या दणदणाटात आश्रम रोडवर हजारो भक्तांची गर्दी



■ **उरुळी कांचन (दै. संध्या)**

सालाबादप्रमाणे यंदाही उरुळी कांचन (ता. हवेली) येथे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आश्रम रोड परिसरात गणरायाचे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात आगमन करण्यात आले. केरळचे पारंपरिक चेंडा मेलम वाद्य, ढोल-ताशांचा गजर, आकर्षक विद्युत रोषणाई आणि तब्बल २५ डीजेंच्या मिरवणुकीत तालावर हजारो गणेशभक्तांनी नाचत-गाजत गणरायाचे स्वागत केले.

आश्रम रोड परिसरात सायंकाळी ६ वाजता सुरू झालेली गणेश आगमन मिरवणूक रात्री साडेदहा वाजेपर्यंत उत्साहात सुरू होती. विविध गणेश मंडळांनी आकर्षक सजावट, पारंपरिक वाद्ये आणि ढोल-ताशांच्या गजरात गणरायाला वाजतगाजत मंडपात आणले. मिरवणुकी दरम्यान संपूर्ण आश्रम रोड परिसर भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणाने भारावून गेला होता. तसेच अखिल पांढरस्थळ मित्र मंडळाच्या वतीने महिलांनी पारंपरिक ढोल-ताशा सादर केला. महिलांच्या ढोल-ताशा पथकाने दमदार वादन करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. ढोल-ताशांच्या तालावर तरुणाईसह नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

आश्रम रोडवर विविध मंडळांच्या मिरवणुकीदरम्यान २५ डीजेंचा आवाज आणि आकर्षक लाईट शो यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. रंगीबेरंगी विद्युत रोषणाईच्या प्रकाशात हजारो भक्तांनी नाचत-गाजत गणरायाचे स्वागत केले. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया अशा जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. दरवर्षी आजूबाजूच्या गावातील व वाड्या वस्तीतील हजारो नागरिक जल्लोषचा आनंद घेत मिरवणूक पाहण्यासाठी येतात.

गणेश आगमन मिरवणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होणार असल्याने उरुळी कांचन पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली एक पोलीस उपनिरीक्षक, ३० पोलीस कर्मचारी आणि २५ होमगार्ड यांनी मिरवणुकीच्या मार्गावर बंदोबस्त ठेवला. पोलिसांच्या नियोजनामुळे मिरवणूक शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. गणेशभक्त, मंडळांचे कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत गणरायाचे जल्लोषात स्वागत केले.

## दानपेटी चोरट्यांनी पळविली

### चोरटे सीसीटीव्हीत कैद

■ **इंदापूर (दै. संध्या)**

इंदापूर तालुक्यातील कालठण नं.१ येथील ग्रामदैवत श्री काळभैरव मंदिरातील दानपेटी पळवून नेणाऱ्या अज्ञात चोरट्यांचा प्रताप सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडलेल्या या घटनेत मंदिरातील अंदाजे ४,००० ते ४,५०० रुपयांची रोकड असलेली दानपेटी पळवण्यात आली असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलीस आता चोरट्यांच्या मागावर आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे सुमारे ३:२० च्या सुमारास मौजे माळवाडी / कालठण नं. १ हद्दीतील श्री काळभैरव मंदिरात अज्ञात चोरट्याने प्रवेश केला. मंदिरातील दानपेटी उचलून नेतानाची संपूर्ण हालचाल परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाली आहे. सकाळी चोरीचा हा प्रकार उघडकीस आल्यानंतर ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या प्रकरणी काकासाहेब बयाजी मांढरे (वय ६१, रा. कालठण नं. १, ता. इंदापूर) यांनी इंदापूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या कलम ३०३(२) अंतर्गत अदखलपात्र गुन्हा (NCR क्र. १४८५/२०२६) नोंदवण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार खान (ब. नं. ५१५) हे करत असून, सीसीटीव्ही फुटेजच्या साहाय्याने आरोपींचा शोध घेतला जात आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना पोलीस निरीक्षक नाळे यांनी वाढत्या चोऱ्यांच्या घटनांवर चिंता व्यक्त केली.



## हर्षवर्धन पाटील यांनी घेतले गणरायाचे दर्शन

■ **इंदापूर (दै. संध्या)**

■ **सिद्धिविनायक, जीएसबी गणपतीचेही दर्शन**

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी गणेशोत्सवानिमित्त मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज ठाकरे यांच्या निवासस्थानी गणरायाचे दर्शन घेतले व गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच हर्षवर्धन पाटील यांनी प्रसिद्ध सिद्धिविनायक, जीएसबी आदी सार्वजनिक गणपतीचेही दर्शन घेतले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी हर्षवर्धन पाटील यांनी गणेशोत्सवानिमित्त गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी देवेंद्र फडणवीस, हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते श्रीगणरायाची आरती करण्यात आली. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या 'नंदनवन' या शासकीय निवासस्थानी गणेशोत्सवानिमित्त भेट देऊन हर्षवर्धन पाटील यांनी गणरायाचे दर्शन घेतले. त्याचप्रमाणे राज ठाकरे यांच्या ' शिवतीर्थ ' निवासस्थानी जाऊन हर्षवर्धन पाटील यांनी गणरायाचे दर्शन घेतले. तसेच हर्षवर्धन पाटील यांनी मुंबईतील प्रभादेवी येथील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक मंदिर, जीएसबी सेवा मंडळ येथे जाऊन श्री गणेशाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील जनतेच्या सुख-समृद्धीकरिता दमदार पावसाची गणरायाकडे प्रार्थना केली. यावेळी हर्षवर्धन पाटील यांच्या समवेत पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण खात्याच्या सभापती अंकिता पाटील ठाकरे, युवा नेते राजवर्धन पाटील उपस्थित होते.

## आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा

■ **व्याख्याते प्रा. सागर चव्हाण**

■ **जेजुरी (दै. संध्या)**

जय मल्हार क्रांती संघटनेच्या वतीने करमाळा शहरात सालाबादप्रमाणे यंदाही आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने राजे उमाजी नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यानंतर सनई-वाद्य, घोडे आणि फटाक्यांच्या आतषबाजीत शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत नागरिक, कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणुकीचा समारोप अथर्व मंगल कार्यालय येथे करण्यात आला.



यावेळी व्याख्याते प्रा. सागर चव्हाण यांनी राजे उमाजी नाईक यांच्या शौर्य, स्वाभिमान, त्याग आणि देशभक्तीचा गौरव केला. ते म्हणाले, "आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांनी अन्यायाविरुद्ध लढा देत स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित केली. त्यांच्या त्याग, धैर्य आणि स्वाभिमानाचा युवा पिढीने आदर्श घेऊन समाजाच्या प्रगतीसाठी कार्य केले पाहिजे." यावेळी दौलत नाना शितोळे यांनी मनोगत व्यक्त करताना, "रामोशी समाजाने संघटित होऊन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने कार्य केले पाहिजे," असे आवाहन केले. कार्यक्रमास जय मल्हार क्रांती संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दौलत शितोळे, महाराष्ट्र अध्यक्ष अंकुशराव जाधव, माजी युवक अध्यक्ष सुधीर नाईक, भाजपा जिल्हाध्यक्ष गणेश चिवटे, करमाळा पंचायत समिती सभापती पूजा ढेरे, पंचायत समिती सदस्य भरत भाऊ अवताडे, चंदूकाका सरडे, राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते, महिला आघाडी महाराष्ट्र सरचिटणीस नितू मदणे, प्रकाश थोरात, रेवणनाथ खंडागळे, प्रमोद वाघमोडे, अनिल थोरात, शुभम बंडगर, नितीन खटके, आफसर जाधव, रामभाऊ ढाणे, दत्ताभाऊ चव्हाण, माढा तालुका अध्यक्ष राहुल मदणे, डॉ. समाधान कोळेकर, बापूसाहेब ढवळे, माजी उपसरपंच संभाजी आबा चव्हाण, माजी उपसरपंच सुरेश पाटील, तुषार पुजारी, धर्मा गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भैरवनाथ वाघमोडे यांनी केले, तर आभार धनंजय ढवळे यांनी मानले. कार्यक्रमास नागरिक, युवक आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

## सरकारी कामात अडथळा प्रकरणी न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

■ **शिरूर (दै. संध्या)**

पोलिसांशी हुज्जत, धक्काबुक्की व शासकीय कामात अडथळा प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या दोन व्यक्तींना सत्र न्यायालयाने सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्त केले.ॲड.संदीप रघुनाथ पवार यांनी याप्रकरणी आरोपींची बाजू मांडली.सन २०१६ मध्ये चाकण चौकात सचिन भालेकर व हर्षद ठुबे यांचे वाहनाची एका कंटेनर वाहनाने नुकसान केले होते.यावरून भालेकर, ठुबे व कंटेनर चालक यांच्यात वाद सुरू असताना तेथे उपस्थित ट्रॅफिक पोलिस व वॉर्डन यांनी दोघांनाही वाहने बाजूला घेण्यास सांगितले. यावेळी भालेकर व ठुबे यांनी पोलिसांशी हुज्जत घातली ,धक्काबुक्की तसेच शासकीय कामात अडथळा आणला असा आरोप करत संबंधित पोलिसाने दोघांवर गुन्हा दाखल केला होता.या प्रकरणी भालेकर व ठुबे यांचे वकील ॲड.संदीप पवार यांनी शिरूर सत्र न्यायालयात दोघांच्या वतीने अंतिम युक्तिवाद केला.मारहाण झाली असती तर, वैद्यकीय दाखला रेकॉर्डला असता,कपडे फाटले असते,शरीरावर मारहाणीच्या खुणा असत्या असा युक्तिवाद ॲड संदीप पवार यांनी केला.फिर्यादी व्यतिरिक्त घटनास्थळी उपस्थित कोणाचीही साक्ष घेण्यात आली नसल्याचेही ॲड पवार यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणले.दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर सत्र न्यायाधीश एन एस मोमीन यांनी ॲड पवार यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून जखमी झाल्याचा वैद्यकीय पुरावा नसल्याने इजा झाली असल्याची पुष्टी होत नसल्याचे तसेच घटनास्थळी स्वतंत्र साक्षीदार असताना त्यांना तपासले गेले नसल्याचे स्पष्ट केले. फिर्यादी पक्षाला आरोपी विरुद्ध वाजवी संशयापलीकडे आरोप सिद्ध करता आले नाही.असे निरीक्षण नोंदवत तसेच सबळ पुरावे नसल्याचे स्पष्ट करत सत्र न्यायाधीश मोमीन यांनी भालेराव व ठुबे यांची या प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली.

# चौफुला दहिहंडीत सराईत गुन्हेगारांचा नंगानाच

■ **सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण करून दहशत पसरविल्याचा आरोप**

■ **महाराष्ट्र पोलीस अधिनियमासह भारतीय न्याय संहितेनुसार कारवाई**

### यवत पोलिसाकडून २४ जणांवर गुन्हा दाखल!



■ **दौंड (दै. संध्या)**

दहिहंडी उत्सवादरम्यान सोशल मीडियावर दहशत निर्माण करणाऱ्या आशयाची रील प्रसारित करणे आणि सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी यवत पोलिसांनी दहिहंडी आयोजकांसह रेकॉर्डवरील आरोपी व त्यांच्या साथीदारांवर कायदेशीर कारवाई केली आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यवत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केडगाव,चौफुला येथे ९ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री सुमारे ८ वाजता श्रीकृष्ण दहिहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजक शुभम प्रकाश टेळे (रा. टेळेवाडी, ता. दौंड) आणि रामकृष्ण आनंदा काळे (रा. बोरीपारधी, ता. दौंड) असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे यांनी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी काढलेल्या आदेशातील महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) च्या तरतुदींचे उल्लंघन करण्यात आले. कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो, याची माहिती असतानाही रेकॉर्डवरील आरोपी व त्यांच्या साथीदारांना दहिहंडी कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आल्याचा आरोप आहे.

या प्रकरणात पोलिसांनी परशुराम उर्फ आबा केरू गडदे, नवनाथ पंढरीनाथ गायकवाड, गौरव उर्फ बंटी दिनेश पांढरे, युवराज राजाराम शिंदे, महेश मारुती ढुले, विशाल दादासो गडदे, विशाल उर्फ अण्णा माकर, सौरभ कोळपे, अनिल शेंडगे तसेच इतर १५ साथीदार अशा एकूण २४ जणांविरोधात कारवाई केली आहे.

दहिहंडी कार्यक्रमादरम्यान चौफुला-सुपा महामार्गावर वाहतुकीस अडथळा निर्माण करून समाजामध्ये शांतता भंग करण्याच्या उद्देशाने दहशत निर्माण करणाऱ्या आशयाची रील इन्स्टाग्रामवर पोस्ट करण्यात आल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. या रीलला 'किंग ऑफ दौंड' अशा आशयाचे कॅप्शन देण्यात आले होते. तसेच आक्रमक आशयाचे गाणे वापरून ही पोस्ट केल्याचे पोलिसांनी माहिती दिली.

या प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने आयोजकांसह संबंधित आरोपी व त्यांच्या साथीदारांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३, २२५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर, सहायक पोलीस निरीक्षक सुधीर कदम, पोलीस उपनिरीक्षक मारोती मेतलवाड तसेच तपास पथकातील पोलिस कर्मचाऱ्यांनी कारवाई केली. सोशल मीडियावर आक्षेपार्ह अथवा दहशत निर्माण करणारा मजकूर प्रसारित करणे आणि सार्वजनिक ठिकाणी कायदा-सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या प्रकारांविरोधात यवत पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.